जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### सार्वजनिक आरोग्य सेवेचा मोठा प्रश्न

पुण्याच्या प्रथितयश दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेवर योग्यवेळी उपचारास नकार मिळाल्याने दुर्दैवाने तिचा मृत्यू झाला. त्यामुळे टीका व चारी बाजूंनी त्यांच्यावर प्रहार झाला.

या प्रतिक्रिया तिखट असल्या तरी स्वाभाविकही आहेत. कारण हे तर धर्मादय होते? यानिमित्त एका मुलभूत व महत्त्वाच्या मुद्याकडे गांभीर्याने लक्ष जायला हवे. तो मुद्दा म्हणजे सार्वजनिक आरोग्य सेवेचा मुद्दाम घोटलेला गळा! आरोग्य सेवेच्या कर्तव्याचे भान ठेव्याची नितांत गरज आहे. लक्षात घ्या ना, सार्वजनिक आरोग्य सेवा मजबूत असती तर खासगी रुग्णालयांना (बहुसंख्य) बेताल व व्यावसायिकरित्या वागण्याचे धाडस झाले असते का?

सरकारकडून जवळपास फुकटात जागा, सेवासवलती घेऊनही लाखोंची अनामत रक्कम मागणाऱ्यांना, किमान दरात सर्वसामान्यांनाही वैद्यकीय सेवा देण्याचा विसर पडतो. किंबहुना त्याबद्दल काहीच वाटत नाही हे धक्कादायक नाही का?

त्यांना उपचार नाकारल्यानंतर ससूनमध्ये जागा संभव नव्हती. इंग्रजांनी १५० वर्षांपूर्वी बांधलेल्या ससून रुग्णालयावर वाढलेला ताण असह्य आहे. चारी बाजूंनी वाढलेल्या पुण्या–मुंबईला अशा ५–१० ससूनसम मोठ्या रुग्णालयांची गरज आहे.

आपल्या अहिल्यानगरचे सिव्हील हॉस्पिटलही अद्यावत सेवा सुविधांनी अधिक सुसज्ज करावे लागेल. सुदैवाने आयुष रुग्णालय उभे राहिले असून, बुरुडगाव रोडवर महापालिकेचे भव्य सार्वजनिक रुग्णालय उभे राहात आहे. आता गरज आहे त्यावर योग्य शासकीय नियंत्रणासह नैतिकता व रुग्णसेवेचे भान असलेल्या सार्वजनिक आरोग्य सेवा सुविधा देणाऱ्या डॉक्टर व स्टाफची...

## भिंगार येथे घरातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी

नगर – राहत्या घरातील प्लायवूडच्या कपाटाच्या बॉक्समध्ये ठेवलेले ४० हजार रुपये किमतीचे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुमके कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना भिंगार येथील महात्मा कॉलनी येथे १६ मार्च रोजी रात्री १० ते १८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत बरखा मनीष छजलानी (वय ४०, रा. महात्मा कॉलनी, भिंगार) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी त्यांचे ९ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे झुमके घरातील प्लायवूडच्या कपाटाच्या बॉक्समध्ये ठेवलेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी बरखा छजलानी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला अधिक तपास सहाय्यक फौजदार दहिफळे करीत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार

## मुलींसाठी स्वतंत्र आयटीआय सुरू होणार, चौंडी येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दीवर्षानिमित्त अहिल्यादेवी यांचे जन्मगाव असलेल्या चौंडी येथे ६ मे रोजी मंत्रिमंडळाची बैठक झाली. यात चौंडी येथील ६८१ कोटींच्या विकास आराखड्याला मंजूरी देण्यात आली. तसेच अहिल्यानगरमध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच मुलींसाठी स्वतंत्र आयटीआय सुरू करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर किर्ती स्तंभ येथे अभिवादन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सह मंत्रीमंडळ.

### मंत्रिमंडळाचे निर्णय

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्यावसायिक मराठीसह बहुभाषिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी, सांस्कृतिक विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करणार

व्यवसायिक चित्रपट असल्याने लागणारा खर्च हा अर्थसंकल्पीय मागण्यांतून उपलब्ध करुन देणार

२) राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणार/आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणार

राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणार. अभियानाच्या माध्यमातून जनजागृती आणि चळवळ निर्माण करणार

कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, लिंगभेदात्मक बाबी दूर सारत मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, बालविवाहमुक्त समाजनिर्मिती, लैंगिक–शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करुन हिंसाचारमुक्त कुटुंब आणि समाजनिर्मिती, अनिष्ठ रुढींचे निर्मूलन, महिलांना शासकीय योजनांचा लाभ आणि स्वयंरोजगाराच्या संधी यातून आर्थिक विकास

हे आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणार्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार देणार

हे अभियान राबविण्यासाठी १०.५० कोटी रुपये खर्च करणार

३) धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव.

'यशवंत विद्यार्थी योजना' म्हणून ही योजना आता राबविणार

दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत शिक्षण

आतापर्यंत यासाठी २८८.९२ कोटी रुपये वितरित

राजे यशवंतराव होळकर यांनी १७९७ ते १८११ या काळात शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक कामे केली. गुरुकुलसारख्या पारंपारिक शिक्षणाला चालना दिली. लष्करी शिक्षणात शिस्त, नीती आणि नेतृत्त्वगुणांचा समावेश केला. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. राजवाड्यात मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा उभारल्या. आता त्यांच्या नावे ही योजना

४) धनगर समाजातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी वसतीगृह बांधण्याच्या योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे नाव

राज्यातील महसूल विभागाच्या मुख्यालयी धनगर समाजातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह

प्रत्येकी २०० क्षमतेची ही वसतीगृह असणार. यात मुलांसाठी १०० क्षमतेचे तर, मुलींसाठी १०० क्षमतेचे.

नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर, अमरावती येथे वसतीगृह

नाशिक येथे काम सुरु, पुणे, नागपूर येथे लवकरच सुरु होणार

या वसतीगृहांना आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना असे नाव

५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या घाट, विहिरी, पाणीवाटप प्रणालीचे सर्वेक्षण करुन त्यांच्या जतनासाठी विशेष योजना राबविणार

राज्यात असे ३ ऐतिहासिक तलाव (चांदवड, त्र्यंबकेश्वर, मल्हार गौतमेश्वर, जेजुरी)

राज्यात अशा १९ विहिरी, राज्यात असे एकूण ६ घाट, राज्यात असे एकूण ६ कुंड अशा एकूण ३४ जलाशयांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन, सुशोभिकरण इत्यादी कामे करणार, यासाठी ७५ कोटी रुपये खर्च करणार.

६) अहिल्यानगर जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करणार

या महाविद्यालयाचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असे नाव असेल.

यासाठी ४८५.०८ कोटी खर्च करणार

जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा, मनुष्यबळासह यासाठी देणार

७) राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून ५५०३.६९ कोटी रुपयांचे मंदिर विकास आराखडे

चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धन : ६८१.३२ कोटी

अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार: १४७.८१ कोटी

श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा : १८६५ कोटी

श्री क्षेत्र ज्योतीबा मंदिर विकास आराखडा : २५९.५९ कोटी

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा: २७५ कोटी

श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा : १४४५.९७ कोटी

श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखडा : ८२९ कोटी

८) अहिल्यानगर येथे मुली आणि महिलांसाठी नवीन आयटीआय सुरु करणार

९) राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथे दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय

१०) ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या मिशन महाग्राम कार्यक्रमाचा कालावधी २०२२–२५ ऐवजी २०२८ पर्यंत वाढविण्याचा निर्णय

११) नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधीकरण अध्यादेश–२०२५ जारी करण्याचा निर्णय

### अहिल्यादेवी होळकर किर्ती स्तंभ येथे अभिवादन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि इतर कॅबिनेट मंत्री यांनी चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर किर्ती स्तंभ येथे अभिवादन केले. तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक आणि त्याच परिसरात असलेल्या महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

स्मारक परिसरात सुरू असलेले गढीचे नूतनीकरण, नक्षत्र उद्यान, संरक्षक भिंत, शिल्प, संग्रहालय, शिवसृष्टी या प्रगतीपथावरील कामांची पाहणी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. अहिल्यादेवी यांचे निवास, स्वयंपाकघर, देवघर, ओसरी, तुळशी वृंदावन, बैठकीचे ठिकाण, धान्य साठविण्याचे ठिकाण, दरबार या स्थळांची पाहणीही श्री.फडणवीस यांनी केली. सभापती प्रा. शिंदे यांनी याबाबतची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. चौंडीसारख्या ग्रामीण भागात प्रथमच मंत्रिमंडळ दाखल झाले होते. त्यामुळे ही मंत्री मंडळ बैठक ऐतिहासिक ठरली.

## केडगाव बायपासवर अपघात; तरुणाचा मृत्यू

नगर – केडगाव बायपास रस्त्यावर सोनेवाडी चौक येथील श्रेया गार्डन समोर ५ मे रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास झालेल्या रस्ता अपघातात तरुणाचा मृत्यू झाला आहे. विजय शांताराम घोडके (वय २६, रा. मांडवगण, ता. श्रीगोंदा) असे मृत तरुणाचे नाव आहे.

विजय घोडके यांचा ५ मे रोजी सकाळी सोनेवाडी बायपास चौकाजवळील श्रेया गार्डन समोर अपघात झाला. त्यात ते गंभीर जखमी झाल्याने यांना त्यांचे नातेवाईक नामदेव घोडके यांनी औषधोपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते औषध उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## कारच्या धडकेत मोटारसायकल स्वाराचा मृत्यू

नगर – नगर – सोलापूर महामार्गावर भरधाव वेगात येणाऱ्या रेनॉल्ट कंपनीच्या कारने पुढे चाललेल्या मोटारसायकलला पाठीमागून जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकल स्वाराचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील रुईछत्तीशी गावाच्या शिवारात, प्रितम पेट्रोल पंपासमोर ४ मे रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली. अनिल भीमराज मुरूमकर (वय ४७, रा. रुईछत्तीशी, ता. नगर) असे मयताचे नाव आहे.



अनिल मुरुमकर

याबाबत ऋतिक अनिल मुरूमकर (वय २४, मूळ रा. रुईछत्तीशी, ता. नगर, हल्ली रा. हंगा, ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांचे वडील अनिल मुरूमकर हे त्यांच्या होंडा कंपनीच्या एच एफ डिलक्स मोटारसायकलवर (क्र. एम एच १६ सी एस ७१६९) रुईछत्तीसी येथून सुपा येथे जात असताना रुईछत्तीशी गावच्या शिवारात प्रीतम पेट्रोल पंपासमोर सोलापूर कडून नगरकडे भरधाव वेगात येणाऱ्या रेनॉल्ट कंपनीच्या कारने (क्र. एम एच १३ डी एम ६३५५) मोटारसायकल ला पाठीमागून जोरात धडक दिली. या धडकेत अनिल मुरूमकर यांच्या डोक्यात जबर मार लागून त्यांचा मृत्यू झाला. मयत अनिल मुरूमकर यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

याप्रकरणी ऋतिक मुरूमकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरुद्ध भा. न्या. सं. २०२३ चे कलम १०६ (१), २८१, १२५ (अ) (ब), ३२४ (२), मोटार वाहन कायदा कलम १८४,१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड करीत आहेत.

## सुरेश सिरवानी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सावेडी येथील पंकज कॉलनीतील रहिवासी सुरेश लालचंद सिरवानी (वय ४९) यांचे ५ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ, १ बहिण असा परिवार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यांच्या आत घ्या

(पान १ वरुन)

### स्थानिक स्वराज्य संस्थांना वाऱ्यावर सोडता येणार नाही

स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिश्चित काळासाठी वाऱ्यावर सोडता येणार नाही. वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथे मुदत संपली आहे किंवा प्रशासन राज आहे अशा सर्वच महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायती व जिल्हा परिषदांची लवकर निवडणुका घेण्यात याव्यात, असे निरिक्षणही कोर्टाने या प्रकरणी आपल्या आदेशात नोंदवले आहे.

### लोकशाहीच्या मूळ तत्वांचा अवमान

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर न घेणे हे लोकशाहीच्या मूळ तत्वांचा अवमान आहे. सद्यस्थितीत ग्रामपंचायत ते जिल्हा परिषदांपर्यंत सर्वच प्रतिनिधिक संस्था केवळ अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याचे चित्र आहे. हे अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची रखडलेली निवडणूक २०२२ च्या जुलैपूर्वी लागू असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारे घेण्यात याव्यात. हा आदेश अंतिम नाही. बांठिया आयोगाच्या अहवालात देण्यात आलेल्या आव्हान याचिकांवरील निर्णयानंतर या निवडणुकांच्या वैधतेवर फेरविचार होऊ शकतो, असे कोर्ट म्हणाले.

### ओबीसी समुदायाला २०२२ पूर्वीचे राजकीय आरक्षण

या प्रकरणाशी संबंधित वकील देवदत्त पालोदकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत. हे राज्यघटनेत नमूद तरतुदींच्या विरोधात आहेत. छत्रपती संभाजीनगर व नवी मुंबई महापालिका ही याची उदाहरणे आहेत. आमच्याकडे अशा अनेक अनियमितता आल्या आहेत. त्यामुळे या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर लोकनियुक्त लोकप्रतिनिधी असणे गरजेचे आहे, असे कोर्टाने आपल्या नमूद केले आहे. कोर्टाने या प्रकरणाशी संबंधित सर्वच पक्षकारांना निवडणूक घेण्यास कुणाचा विरोध आहे का? असा प्रश्न केला. त्यावर सर्वांनी 'नाही' असे उत्तर दिले. त्यानंतर कोर्टाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले.

ओबीसी समुदायाला २०२२ पूर्वी जे राजकीय आरक्षण होते, तेच आरक्षण त्यांना पुन्हा देण्यात यावे. त्यानंतर ४ आठवड्यांच्या आत राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकीची अधिसूचना काढावी. या प्रकरणी वादाचे सर्वच मुद्दे टाळले जावेत असेही कोर्टाने या प्रकरणी म्हटल्याचे या वकिलाने सांगितले.

### सप्टेंबरपूर्वी निवडणूक प्रक्रिया होणार पूर्ण

दुसरीकडे, वकील सिद्धार्थ शिंदे यांनीही सुप्रीम कोर्टाचा आदेश समजावून सांगितला आहे. सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश दिले. कोर्टाने ही निवडणूक १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी स्थिती होती त्यानुसार या निवडणुका घेण्याचे आदेश दिले. निवडणूक आयोग व राज्य सरकारला येत्या सप्टेंबर महिन्याच्या आत ही निवडणूक घ्यावी लागेल, असे ते म्हणाले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढेल : मुख्यमंत्री

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती एकत्रित लढेल. एखाद्या ठिकाणी एखादा वेगळा निर्णय स्थानिक स्तरावर होऊ शकतो. पण धोरण म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्र लढेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली आहे.

## ५ व्या मजल्यावरून उडी मारुन महिलेची आत्महत्या

नगर – राहते घराच्या पाचव्या मजल्यावरुन उडी घेतल्याने गंभीर जखमी होवून महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर मनमाड रोडवरील बोल्हेगाव येथील भारत बेकरी समोर ५ मे रोजी दुपारी १२.३० वाजल्याच्या सुमारास घडली. सुनिता संदीप तोडमल (वय ३२, रा. भारत बेकरी समोर, बोल्हेगाव) असे मृत झालेल्या महिलेचे नाव आहे.

सुनिता तोडमल यांनी राहात असलेल्या इमारतीच्या ५ व्या वरुन उडी मारल्याचे खाली पडून त्या गंभीर जखमी झाल्या. हे समजताच त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना औषध उपचाराकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाल्या असल्याचे घोषित केले. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी सूतगिरणी व रस्त्याच्या कामाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी सूतगिरणी व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत चौंडी ते निमगाव डाकू रस्त्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मागासवर्गीय बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले आदी उपस्थित होते.



चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी सूतगिरणी व रस्त्याचे भूमिपूजन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदी.

सूतगिरणीमुळे परिसरात रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून नवीन रस्त्यामुळे दळणवळण सुलभ होणार आहे. चौंडी शिवारात उभारण्यात येत असलेल्या या सूतगिरणीसाठी ९१ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत चौंडी ते निमगाव डाकू दरम्यानचा २.७०० किलोमीटर लांबीचा रस्ता साकारण्यात येणार आहे. या कामासाठी राज्य शासनाने ३ कोटी ९४ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे. हे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून हाती घेण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सूतगिरणी याच रस्त्यावर असल्याने ५.५० मीटर रुंद डांबरी रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. पाच वर्षांसाठी देखभाल व दुरुस्ती खर्चासाठी आवश्यक निधीची सुद्धा तरतूद करण्यात आली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### मनाला अशी द्यावी चालना

तुम्ही ३० वर्षांचे असाल, काम आणि कुटुंबात रममाण असाल किंवा ६० वर्षांचे असाल, निवृत्तीचा आनंद घेत असाल, एक तीक्ष्ण, जागरूक मन तुमचे जीवन असंख्य प्रकारे समृद्ध करू शकते. ते तुम्हाला चांगले निर्णय घेण्यास, भावनिकदृष्ट्या संतुलित राहण्यास आणि उत्सुकतेने आणि आनंदाने शिकत राहण्यास मदत करते. मेंदू हा एका स्नायूसारखा असतो - तुम्ही त्याला जितके जास्त आव्हान द्याल तितके ते अधिक मजबूत होते. दरवर्षी किंवा अगदी दर महिन्याला काहीतरी नवीन शिका. एक नवीन छंद जोपासा, ऑनलाइन कोर्स घ्या किंवा तुम्ही कधीही न शोधलेल्या विषयाबद्दल वाचा. आयुष्यभर शिकल्याने त्या मज्जातंतू मार्गांना चालना मिळते. त्याचप्रमाणे नियमित शारीरिक हालचाल हा तुमच्या मेंदूचे रक्षण करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. दिवसातून ३० मिनिटे चालणे, नाचणे किंवा योगाभ्यास केल्याने तुमच्या मेंदूसह रक्तप्रवाह वाढतो आणि त्यामुळे स्मरणशक्ती आणि विचार कौशल्ये सुधारतात, असे एका संशोधनातून सिद्ध झाले आहे.

## पाककला

### मशरुम दलिया

**साहित्य :** एका गाजराचे बारीक काप, १/२ वाटी मटार दाणे, टेबल स्पून शेंगदाणे, ६ ते सात मशरूम चे काप, १ कांदा बारीक चिरलेला, १ टेबल स्पून आले-लसूण पेस्ट, १ टेबलस्पून तूप किंवा तेल, १ टेबलस्पून लाल तिखट, १/२ टी स्पून हळद, मीठ चवीनुसार,

**कृती :** सर्वप्रथम तेलामध्ये दलिया चांगला परतून घ्यावा आणि दुप्पट पाण्यामध्ये तो चांगला वाफवून शिजवून घ्यावा सोबतच त्यात मटार दाणे शेंगदाणे घालून शिजवून घ्यावे आता फोडणी करता कांदा गाजर आणि मशरूमचे काप करून घ्यावेत. कढईत तूप गरम करून जीरे मोहरीची फोडणी तयार करावी त्यामध्ये कांदा ट्रान्सपरंट होईपर्यंत परतावा त्यातच आले लसूण पेस्ट घालून दोन मिनिटे परतावे त्यानंतर त्यामध्ये गाजर आणि मशरूमचे काम त्यात हळद, लाल तिखट, मीठ घालून चांगले परतावे. आता त्यामध्ये एक ग्लासभर पाणी घालून पाच मिनिटं मशरूम गाजर शिजू द्यावे. आता त्यामध्ये वाफवलेल्या दलिया घालून पुन्हा एकदा सर्व चांगले एकत्र करून घ्यावे. पुन्हा एकदा दलिया चांगला हलवून झाकण ठेवून एक पाच मिनिटे शिजू द्यावा. वरुन कोथिंबीर भुरभुरुन गरमागरम सर्व्ह करावे.

## वास्तू

### ... तर हे ठरेल अशुभ

✻ जर तुम्ही कपडे भेट म्हणून देण्याचा विचार करत असाल तर एक गोष्ट लक्षात ठेवा वास्तु नियमांनुसार चुकूनही कोणालाही काळ्या रंगाचे कपडे देऊ नका, कारण काळ्या रंगाचे कपडे देणे खूप अशुभ मानले जाते.

✻ वास्तुशास्त्रानुसार कोणालाही परफ्यूम भेट म्हणून देवू नये ते अशुभ मानले जाते.

✻ चुकूनही बूट किंवा चप्पल भेट म्हणून देवू नये. असे केल्याने अनेक समस्या उद्भवतात.

## सल्ला

✻ मातीच्या भांड्यात दही लावावे म्हणजे दही छान घट्ट होते.

✻ खिचडी मोकळी होण्यासाठी साबुदाणा भिजत घालताना त्यात २-३ चमचे दूध घालावे.

## सौंदर्य

✻ एक निरोगी महिला दिवसातून ३-४ वेळा चेहरा धुवू शकते.

✻ मसाज केल्यानंतर एक चांगला फसवॉश घ्या आणि तो चेहऱ्यावर चांगला लावावा आणि चेहरा स्वच्छ करावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. ७ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, पूर्वा १८।१७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : बेफिकीर बोलल्याने अडचणीत याल. धावपळ जास्त होईल. देवाण-घेवाण टाळा. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**वृषभ** : स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. इतर लोकांना तुमचे वचार पटतील. व्यापार व्यवसायात चांगला होईल.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. राजकीय विषयांमध्ये स्थिती आनंददायी राहील. अधिकार क्षेत्र वाढेल.

**कर्क** : देवाण-घेवाण करताना फसवणूक होईल. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक.

**सिंह** : मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळल्याने अनेक लाभ होतील. कामात अत्यंत व्यस्त राहाल.

**कन्या** : स्त्री पक्षाकडे लक्ष ठेवाल. अधिक श्रम करावे लागतील. आरोग्य मध्यम राहील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**तूळ** : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. आज घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रगती आपणास संतुष्टी देईल. अध्यात्मिक उन्नती होईल.

**वृश्चिक** : इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. आरोग्य उत्तम राहील. शुभ वार्ता मिळतील. कार्यालयामध्ये वाद होण्याची शक्यता आहे.

**धनु** : एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे.

**मकर** : हसत खेळत दिवस जाईल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील. कुटुंबातही वेळ चांगला जाईल.


**कुंभ** : देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा. अत्यंत व्यस्त राहाल. घरातील लहान मुले त्रास देतील.

**मीन** : आरोग्य उत्तम राहील. पत्र मिळेल. आपल्या आरोग्याची काळजी घ्या. विवाहेच्छुकांचे विवाह जमतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७१

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) आकाश; गगन; नभ ४) तुरुंगातील वास्तव्य; तुरुंगात राहण्याची शिक्षा ६) अगदी गोल; वाटोळा ८) वाईट होवो असा उच्चार; शाप १०) लोकसभा किंवा राज्यसभेचा सभासद १३) मुंज झाल्यावर गळ्यातून खाली लोंबता दोरा अडकवितात तो १४) जडपणा; पत; प्रतिष्ठा १६) मिठी; आलिंगन १७) उंचसखल नसलेले; सपाट १९) वितरण; वाटणी; बटवडा २१) यजन; यज्ञ; मख २३) चेष्टा, मस्करी २४) उदारता; शील; सद्वर्तन

**उभे शब्द :-** १) अंगात घालण्याचे वस्त्र; सदरा २) होय या अर्थाचा एक शब्द; पू ३) मस्ती; जोर ४) एक प्रकारचा दगड ५) मिळून; बरोबर; सहवर्तमान; धरून ७) पद्धत; चाल; तऱ्हा ९) अंतर; फरक ११) शोभिवंत केलेली रचना; आरास १२) धर्मार्थ देणे १५) नाव; होडी; जहाज १६) दरवाजा; दार; द्वार १८) साधू, संन्यासी वगैरेंचे राहण्याचे ठिकाण; एक धान्य २०) मार्ग; रस्ता; मार्ग २२) गेलेला; भूत; अवस्था; दशा

शब्दगंध क्र. ७१७० चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : वेळ जेव्हा न्याय करते तेव्हा साक्ष आणि पुरावा यांची गरज भासत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### रेल्वेमध्ये कोणते फळ नेण्यास सक्त मनाई आहे?

सामान्यपणे प्रवासात आपण खाण्यासाठीही काही ना काही सोबत घेतो. पण एक फळ जे तुम्ही ट्रेनमध्ये नेऊ शकत नाही. हे फळ ट्रेनमध्ये नेण्यास मनाई आहे. रेल्वे प्रवासाचेही काही नियम आहेत. रेल्वे प्रवासात मोजकंच सामान नेण्याचा सल्ला दिला जातो. काही सामान ट्रेनमधून नेण्यास मनाई असते. यात एका फळाचाही समावेश आहे. रेल्वेने प्रवास करताना विस्फोटक, सिलेंडर, ज्वलनशील पदार्थ आणि पाळीव प्राण्यांनाही नेण्यास मनाई असते हे तुम्हाला माहितीच असेल. पण एक असे फळही आहे जे तुम्ही ट्रेनमध्ये नेऊ शकत नाही.

रेल्वेत फळ नेण्यास मनाई हे वाचूनच तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण रेल्वेच्या नियमावलीत या फळाला ज्वलनशील पदार्थ म्हटलं आहे. आता फळ आणि ज्वलनशील कसं काय असेल असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. अगदी विक्रेतेसुद्धा हे फळ जेव्हा ट्रेनमध्ये विकतात तेव्हा त्याच्या साली काढूनच ते विकताना, साल न काढता ते ट्रेनमध्ये विकता येत नाही. आता हे फळ कोणतं हे जाणून घेण्याची उत्सुकता तुम्हाला असेल.

हे फळ आहे नारळ. जे लवकर सडण्याची भीती, तसंच त्यावर बुरशी लागण्याची शक्यता असते. त्यामुळे रेल्वेनं प्रवास करताना हे फळ तुम्ही ट्रेनमध्ये नेऊ नका. नारळ फळ ट्रेनमध्ये नेऊ शकत नाही, कारण ते इतर प्रवाशांसाठी धोकादायक ठरू शकते. नारळामुळे इतर प्रवाशांना इजा होऊ शकते किंवा ते फळ खराब होऊन दुर्गंध येऊ शकतो.

या कारणांमुळे भारतीय रेल्वेच्या नियमांनुसार नारळ फळ घेऊन प्रवास करणे प्रतिबंधित आहे. नारळ पडल्यास ते इतर प्रवाशांना दुखापत करू शकते. तसेच, नारळाचे पाणी सांडल्यास त्यावरुन प्रवाशांचे पाय घसरुन अपघात होण्याचाही धोका संभवतो. तसेच नारळ फळ खराब झाल्यावर ते दुर्गंधित होऊ शकते आणि रेल्वेच्या स्वच्छतेसाठी हानिकारक ठरू शकते. भारतीय रेल्वेचे नियम प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि रेल्वेच्या स्वच्छतेसाठी असतात, आणि या नियमांनुसार नारळ फळ घेऊन प्रवास करणे प्रतिबंधित आहे.

### भूषण

एकदा एक बाभळ शेजारच्या सागवानास म्हणाली, 'अरे, तुला आपल्या शक्तीचा मोठा गर्व वाटतो, पण मोठे वादळ झाले असता, त्यात तू टिकतोस का मी टिकते हे आता प्रत्यक्षच पाहू.'

काही वेळाने मोठे वादळ होऊन त्यात सागवान ताठ उभा राहिल्यामुळे वाऱ्याच्या जोराने मुळासकट उन्मळून पडला व बाभळीने नम्रतेने आपल्या फांद्या वाकविल्यामुळे ती सुरक्षित राहिली.

वादळ संपल्यावर बाभळ मोठ्या डौलाने सागवानास म्हणते, 'कोणाचा पराभव झाला, माझा की तुझा? यावर सागवान उत्तर करतो, 'अगं, या गोष्टीला तू शक्तीची परीक्षा समजतेस तर मग तुझ्या मूर्खपणाची कमाल झाली असे म्हटले पाहिजे. तू जी अद्याप उभी आहेस याचे कारण तुझी अशक्तता. वादळाशी दोन हात करण्याचे सामर्थ्य तुला नसल्यामुळे तू खाली मान घालून नम्रता दाखवलीस. पण माझी गोष्ट तशी नाही. मी लढता लढता पडलो, दुबळेपणा दाखवून आणि करुणा भाकून जिवंत राहण्यापेक्षा लढता लढता आलेले मरण अधिक भूषणास्पद होय!'

तात्पर्य : लढता लढता आलेले मरण अधिक भूषणास्पद होय.

## रहमते दर्शन (भाग - १)



जब कारों का काफिला आ खड़ा हुआ तो संगत ढोलक और चिमटा बजा कर शब्द गा रही थी। सत्गुरु की मीठी आमद पर दिसम्बर के महीने की सर्दी किसी को याद न रही। जब हाल कमरे में महाराज जी और माता जी विराजमान हुए तो संगत का हर बशर, प्यार मोहब्बत की लहर और खुशी में ज़ोर-ज़ोर से सिसकियाँ भर रहा था । सब की आँखों से नीर बह रहा था और काफ़ी देर तक सब इसी तरह चुपचाप सन्नाटे में महाराज जी के दर्शन करते रहे। खुद महाराज जी और माता जी की आँखों में भी प्यार भरे अश्कों की लहरें थीं । आखिर महाराज जी के एक वाक्य ने ख़ामोशी तोड़ी और उन्होंने कहा, जिस बाढ़ को रोकने के लिए मैं आया था, मैं खुद उसमें बह रहा हूँ। फिर उसके बाद सारी रात संगत महाराज जी के दर्शनों से निहाल होती रही।

### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

मुहब्बत के गीत ऐसे भी गाए जाते हैं

सुबह करीब ३ बजे का वक्त था तो मेरी नन्ही सी बेटी माना, जो पहले भी महाराज कृपालसिंह जी के हमारे घर आने पर शब्द सुनाती थी, उसी तरह शब्द सुनाने के लिए संत दर्शनसिंह जी महाराज के कमरे में पहुँची। महाराज जी अभी पलंग पर बैठे ही थे। उसे देख कर लेट गये और बेटी माना से शब्द सुनने की बजाये उसे अपनी छाती पर लिटा लिया और वे एक-दूसरे की आँखों में गुम हो गये। पूज्य माता जी ने यह दृश्य देखकर राजपूत फोटोग्राफर को बुलाकर इस दृश्य को कैमरे के कैद करवा दिया। ये फोटो 'Seeing is bove ll' नामक किताब में छप चुके हैं।

मेरी बेटी उतनी देर प्यार मुहब्बत के समुंदर में खोई रही जितनी देर उसने शबद गाना था। मुहब्बत के गीत ऐसे भी गाये जाते हैं । प्यार के खजाने लुटाने वाला

इसी दौरे की दो घटनायें हैं :

(१) मुकेरीयां से महाराज जी को पटानकोट जाना था। दोपहर के खाने के बाद चलने में बहुत देर हो रही थी और प्रबंधकगण देरी की वजह से जल्दी चलने के लिए कह रहे थे। इतने में बहन 'राज' महाराज जी के पास आई और आँखों में आँसू लिए हाथ जोड़ कर बोली, हुजूर, आप मेरे घर नहीं जाओगे ? सुबह तड़के से मैं अपनी गली धो रही थी, तो पड़ोसियों ने पूछा कि आज क्या बात है जो इतनी खुश हो, सारी की सारी गली धो रही हो, तो मैंने उन्हें बताया कि आज मेरे गुरु जी ने मेरे घर आना है। इतना सुनना था कि महाराज जी झट से बोले, हाँ मैं तुम्हारे घर चलने को तैयार हूँ ।

महाराज जी सड़क और गली तंग होने की वजह से पैदल चल कर उनके घर पहुँचे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यह चक्र स्फूर्ति का केन्द्र है। साधक का स्वास्थ्य सुदृढ और पुष्ट करने के लिए उसकी ऊर्जा नियंत्रित करता है। इस चक्र का प्रभाव एक चुम्बक की भांति होता है, जो ब्रह्माण्ड से प्राण को अपनी और आकर्षित करता है। मणिपुर चक्र के सक्रिय होने से मनुष्य नकारात्मक ऊर्जाओं से मुक्त हो जाता है।

यह चक्र मुख्य रूप से अग्नाशय (Pancreas) तथा पाचन क्रिया (Digestive System) की कार्य प्रणाली को संचालित करता है। जठरागनी द्वारा भोजन को ऊर्जा में बदलता है। यह पेट, लीवर, बड़ी आंत को नियंत्रित करता है। इस चक्र के असंतुलित होने पर जठराग्नि की अग्नि मन्द पड़ जाती है फिर भोजन पचने के बजाए सड़ता है। जिससे धीरे-धीरे बीमारियां आने लगती हैं। अगर ये चक्र कम गतिशील है तो घबराहट, भय, अशान्ति, आत्म विश्वास की कमी, असफलता का डर, भविष्य, असुरक्षा की भावना बनी रहती हैं।

असंतुलित होने पर यह चक्र तेज गति से कार्य करता है और व्यक्ति अक्रामक बन जाता है, अलोचनात्मक बन जाता है, जरुरत से अधिक काम में डूबा रहता है और अपने अधीनस्थ लोगो व कर्मचारियों को डरा धमका कर रखने का निरंतर प्रयास करता है।

### स्वाधिष्ठान चक्र

टाइगर स्टोन नामक रत्न की अंगूठी, पेंडेंट अथवा ब्रेसलेट पहनने से यह चक्र संतुलित होता है। सिटराईन (Citrine) अथवा पुखराज भी लाभ दायक रत्न होते हैं। परन्तु इन्हें पहनने से पहले अपने ज्योतिषी से सलाह ले लेनी चाहिये।

जब यह चक्र संतुलित होता है तो व्यक्ति के अन्दर से चुगली, लज्जा, भय, घृणा, मोह, आदि अवरोधक तत्व दूर हो जाते हैं। व्यक्ति खुद तथा दूसरों का सम्मान तथा प्यार करने लगता है।

इस चक्र का प्रभाव चुम्बक की तरह होता है जो आकाश से ऊर्जा खींचता है।

सात्विक भोजन, दाल रोटी, फल, हरी सब्जियां और गाय का दूध प्रयोग करने से जो ऊर्जा मिलती है वह मणिपुर चक्र को संतुलित रखती हैं। सात्विक भोजन अर्थात ज्यादा तला भुना न गया हो, अत्याधिक मसाले न हो, मांसाहार तथा अंडे आदि न हो। गेहूं, चना, चावल, जौ, दाल मूंग, मसूर, आहार को सात्विक माना गया है। सात्विक अन्न के सेवन से विटामिन बी-१, बी-२, बी-३, प्रोटीन, मैग्नेशियम तथा आयरन मिलता है, जिस से शरीर ठीक रहता है और मणिपुर चक्र संतुलित रहता है। इसलिए सभी दालें, अनाज, फल, सब्जियां, ड्राई फ्रूट्स महीने में एक बार थोडी सी जरुर खानी चाहिए। अगर आप बीमार हैं और डाक्टर ने मना कर रखा है वह वस्तु भी महीने में एक बार जरुर खाएं और सिर्फ इतनी खाएं जितनी आप के मुख में एक बार आ जाये। नहीं तो हमारे शरीर में एक खास किस्म के विटामिन कम हो जाते हैं और दूसरें अनेकों रोग खड़े हो जाते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

तुकाराम सखारामच्या ६० व्या वाढदिवसाला येतो...

तुकाराम : काय रे सख्या, लेका हे केक वर बल्ब का लावलास?

सखाराम : अरे ६० मेणबत्या कुठे लावत बसू, ६० वॅटचा बल्ब लावून टाकला...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ 'हात ओला तर मित्र भला' या म्हणीचा अर्थ काय?

- फायदा असेल तरच लोक जवळ येतात

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### आयुर्वेदिक बालगुटी

७. बालहिरडा- हा काळसर रंगाचा व छोट्या आकाराचा असतो. हा त्रिदोषात्मक असून, उत्तम आमपाचक, कफनाशक आहे. जठराग्नीची, तसेच धात्वाग्नीची वृद्धी करतो. अपचनामुळे, तसेच कफामुळे लहान बाळांमध्ये होणारे विकार या बालहिरड्यामुळे होत नाहीत. गाट.

८. मरूडशेंग- ही दोरीला पीळ दिल्यासारखी दिसणारी अशी शेंग असते. म्हणून याला मुरुडशेंग असे म्हणतात. बाळाच्या पोटात मुरडा येणे, दुखणे यामुळे थांबते, म्हणून याचा वापर गुटीत केलेला आहे.

९. अतिविषा- अतिविषा ही वनस्पती पिवळसर पांढरट रंगाची काडीसारखी दिसत. बालकाच्या सर्व व्याधींवर उत्तम कार्य करीत असताना तिला आयुर्वेदामध्ये बालभैषज्य असे नाव दिले आहे. बालकांमध्ये निर्माण होणारे उलटी, जुलाब, बालदमा, खोकला या आजारांमध्ये उत्तम कार्य करते, म्हणून याचा वापर गुटीमध्ये करतात.

१०. संचळखार- यास काळे मीठ असेही म्हणतात. हे पाचक, रेचक आहे. याने बाळाचा गॅस कमी होऊन पोट हलके होते व बाळाच्या पोटात गुबारा धरत नाही, म्हणून गुटीत याचा वापर करावा.

११. डिकामली चूर्ण- दिसायला डिंकासारखा पिवळसर असतो. बाळाला हिरवट रंगाची पातळशी संडास होत असेल, तर याच्या चूर्णाचा वापर करतात. याच्या वापरामुळे बाळांमधील कृमींचा (जंत) नाश होतो, म्हणून बाळाला मोडशी झाल्यास, तसेच संडासचा वास येत असल्यास याचा वापर करावा. यामुळे बाळाची पचनशक्ती सुधारून कृमींचा नाश होतो. याचा वापर गरजेपुरताच करावा. रोजच्या गुटीत करू नये.

१२. वेखंड- दिसायला ज्येष्ठमधाच्या काडीसारखीच, पांढरट पिवळसर रंगाची काडी असते.

काडीवर थोड्या थोड्या अंतरावर उसाच्या पेरासारख्या खाचा असतात. हिला तीव्र गंध असतो व बाळाच्या बुद्धीसाठी अत्यंत उपयुक्त असल्याकारणाने याला मेध्य रसायन असे म्हटले आहे. याच्या वापरामुळे बाळाची बुद्धी, स्मृती वाढते. तसेच वेखंड उष्ण असल्याकारणाने बाळाला सरदी झाल्यास हे औषध बाळाच्या डोक्यावर, छातीवर लावतात.

**१३. खडीसाखर -**

ही शीत गुणधर्माची व गोड असल्याकारणाने हिचा वापर गुटीत करतात. बाळाला होणारे उष्णतेचे विकार, ताप येणे, तोंड येणे, लघवी गरम होणे किंवा होत नाही म्हणून खडीसाखरेचा वापर गुटीत करावा. त्याच्या वापरामुळे वरील सर्व औषधी द्रव्यांना गोड चव येते व त्यामुळे गुटीचे चाटण बाळ व्यवस्थित करते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# मुनोत सुपर जॉइंट्स संघ ठरला भगवान महावीर चषक कपचा विजेता

नगर – वाडिया पार्क मैदानावर फ्लड लाईटच्या प्रकाशझोतात झालेल्या भगवान महावीर चषक क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात झाला. क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना भंडारी ११ विरुद्ध योगीराज स्मॅशर्स यांच्यात झाला असून, भंडारी ११ ने प्रथम फलंदाजी करीत १० षटकार १२६ धावाचा डोंगर उभा केला. आणि योगीराज स्मॅशर्स संघाने १० षटकात अवघ्या ५० धावांपर्यंत मजल मारली असल्यामुळे १६ व्या भगवान महावीर चषक क्रिकेट स्पर्धेचा विजेता भंडारी ११ ठरला.

या वर्षीपासून रिले धावणे, रस्सीखेच आणि बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन केले होते. या मधील रस्सीखेच स्पर्धेचा अंतिम सामना मुनोत सुपर जॉइंट्स विरुद्ध स्पीडि विल्स यांच्यामध्ये झाला असून, ’जोर लगाके ऐसा’ या जयघोषात अतितटीचा सामना झाला. यामध्ये स्पीडि विल्स संघ विजेता ठरला. तसेच रिले धावणे स्पर्धेचा अंतिम सामना भंडारी ११ विरुद्ध मुनोत सुपर जॉइंट्स यांच्यामध्ये झाला असून, मुनोत सुपर जॉइंट्स संघ विजेता ठरला. या स्पर्धेमधील चारही क्रीडा प्रकारातील गुण संख्येमध्ये मुनोत सुपर जॉईंट संघाला जास्त गुण मिळाले असल्यामुळे या वर्षीचा महावीर कप विजेता संघ मुनोत सुपर जॉईंट ठरला आहे.

वाडिया पार्क येथे स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. यावेळी रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. संदीप मुनोत, डॉ. निलीमा मुनोत, डॉ. आशिष भंडारी, विलास पोखरणा, सरदारमल सिंघवी, अजित बोरा, सुमतीलाल कोठारी, चेतन बोगावत, मनपा महिला बालकल्याण समिती माजी सभापती मीनाताई चोपडा, साक्षी चोपडा, संजय चोपडा, राजेंद्र गांधी, राजेंद्र बोथरा, रवींद्र शेलोत, अध्यक्ष राजेंद्र तातेड, किरण पोखरणा, अजय गुगळे, प्रीतम पोखरणा, अतुल शेटीया, प्रवीण शिंगवी, रुपेश भंडारी, प्रफुल्ल मुथा, डॉ. सचिन बोरा, अमित पितळे, लक्ष्मीकांत शेटिया, प्रीतम गुंदेचा, उमेश मंत्री, निलेश मंत्री, आनंद पितळे, वर्धमान मुनोत, राहुल शिंदे, राहुल शेटिया, अभी कोके, सुयोग लुनिया, मयूर पितळे, सी.ए आनंद गांधी, आनंद कटारिया, रुपेश कटारिया, सचिन कटारिया, रितेश बोरा, आनंद नाहाटा, अनिल दुगड, बापू गांधी, किरण पोखरणा, पवन पोखरणा, निखील गुगळे, सचिन कटारिया, विकास सुराणा, बापूसाहेब गोरे, अजय कांबळे उपस्थित होते.



मुनोत सुपर जॉइंट्स संघ भगवान महावीर चषक कपचा विजेता ठरला. (छाया – लहू दळवी)

### क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

नगर शहरात भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करून युवकांना खेळण्यासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. शिस्तबद्ध व दर्जेदार क्रीडा स्पर्धेचे आयोजन होणे ही काळाची गरज बनली आहे, पुणे–मुंबई सारख्या स्पर्धा नगर शहरात होत आहे, ही बाब कौतुकाची आहे. वाडिया पार्क मैदानावरती महावीर चषक क्रीडा स्पर्धा पाहण्यासाठी महिलांची एवढी मोठी संख्या पाहून असे वाटते की या स्पर्धेने खेळाडूंचा विश्वास संपादन केला असल्याचे मत डॉ. संदीप मुनोत यांनी व्यक्त केले.

महावीर चषक परिवाराच्या वतीने माजी आमदार अरुण जगताप यांना वाडिया पार्क मैदानात श्रद्धांजली अर्पण करीत त्यांच्या आठवणीला उजाळा दिला. स्व. अरुण जगताप यांनी नेहमीच महावीर चषक क्रीडा स्पर्धेला प्रोत्साहन दिले. जैन समाजाच्या प्रत्येक सुखदुःखात सामील झाले. यावेळी काकांच्या आठवणीने सदस्य भावुक झाले, तसेच अरुणोदय व पांजरापोळ संस्थेला गाईंच्या चाऱ्यासाठी धनादेश डॉ. विजय भंडारी, सुमतीलाल कोठारी, सुभाष घोडके, किशोर डागा, संतोष सूर्यवंशी, राजू शेटिया, ज्ञानेश्वर रासकर, चंद्रकांत औशीकर यांच्या हस्ते देण्यात आला.

महावीर चषक क्रिकेट स्पर्धेतील मॅन ऑफ द सिरीजचा किताब चंपालाल बोगावत यांच्या स्मरणार्थ खेळाडू निलेश मंत्री यांना दिला आहे. तसेच उत्कृष्ट बॅट्समन आनंद बलदोटा, उत्कृष्ट फिल्डर प्रथम मुनोत, उत्कृष्ट बॉलर वीर कासलीवाल. तसेच बैडमिंटन स्पर्धेतिल विजेता नमो ९९ संघाचे गिरीश पुरोहित, सिद्धार्थ मुनोत तर उपविजेता गांधी ब्लास्टर संघाचे अक्षय कटारिया, ऋषभ कटारिया, संकेत मानधना यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भगवान महावीर चषक कप क्रीडा स्पर्धेतील बॅडमिंटनचे ५१ हजारचे प्रथम पारितोषिक नमो ९९ तर गांधी ब्लास्टर या संघाला ३१ हजार रुपये तसेच रस्सीखेच स्पर्धेचे ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक स्पीडि व्हील्स संघाने पटकावले. तर ३१ हजार रुपयाचे द्वितीय पारितोषिक मुनोत सुपर जॉइंट्स यांनी मिळवले. तर रिले धावणे स्पर्धेचे ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मुनोत सुपर जॉइंट्स तर ३१ हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक भंडारी ११ यांना दिले. तसेच क्रिकेट स्पर्धेतील ५१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक भंडारी ११ यांनी मिळवले तर ३१ हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक योगीराज स्मॅशर्स या संघाने मिळवले. या स्पर्धेतील भगवान महावीर कपचा किताब १ लाख ११ हजार ११ रुपयाचा मानकरी मुनोत सुपर जॉइंट्स या संघाने मिळवला.

# ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सौ. सरोजताई आल्हाट

### निमगाव वाघा येथे १४ मे रोजी संमेलन; राज्यभरातील साहित्यिकांची राहणार उपस्थिती



नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन १४ मे रोजी करण्यात आले असून, या संमेलनाच्या अध्यक्षपदी कवयित्री व साहित्यिक सरोज आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता परिवार मंगल कार्यालय येथे या संमेलनाचे उद्घाटन होणार असून, संमेलनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी गावातून काढण्यात येणार आहे.

या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंतांचे परिसंवाद, व्याख्याने, कवी संमेलन, तसेच ग्रंथ प्रदर्शन यांचा समावेश असून, एक साहित्यिक पर्वणीच ठरणार आहे, अशी माहिती संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

संमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी भूषविणाऱ्या सरोज आल्हाट या गेली ३० वर्षे साहित्य, समाजसेवा आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत एतिहासिक बहुभाषिक कवी संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या मराठीत चार आणि इंग्रजीत एक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. पहिल्या ग्रामीण ख्रिस्ती साहित्य संमेलनातील काव्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषविले होते. साहित्य क्षेत्रातील अनेक मानाचे पुरस्कार देखील त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे नाना डोंगरे यांनी सांगितले आहे.



भिंगारमध्ये जगत ज्योती महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम यांची जयंती उत्साहात साजरी झाली. दोन्ही समाजाच्यावतीने मिरवणूक काढण्यात आली.

# महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम यांची भिंगार येथे मिरवणूक व जयंती सोहळा

भिंगार – जगत ज्योती महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम यांची जयंती उत्साहात साजरी झाली. दोन्ही समाजाच्यावतीने मिरवणूक काढण्यात आली. भिंगारमध्ये जगत ज्योती महात्मा बसवेश्वर व भगवान परशुराम यांची जयंती साजरी झाली. विशेष म्हणजे याप्रसंगी ब्राह्मण सभा, लिंगायत समाज यांनी संयुक्त भिंगार शहरातील प्रमुख रस्त्यावरून वाजत गाजत मिरवणूक काढली होती. यात समाज बांधव उपस्थित होते. स्त्रियांची उपस्थिती उल्लेखनीय होती. याप्रसंगी बँडच्या तालावर स्त्रियांनी फेर धरले, फुगड्या खेळल्या. तसेच पुरुषवर्गाने देखील नृत्य केले.

मिरवणुकीच्या अग्रभागी भगवान परशुराम व जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे फोटो लावण्यात आले होते. भिंगार येथील रहिवासी यांनी त्याची पूजा केली. या मिरवणुकीनंतर ज्ञानेश्वर मंदिरात भगवान परशुराम यांची विधिवत पूजा झाली. त्यानंतर महात्मा बसवेश्वर मंदिरात समाजाचे जंगम रमेश स्वामी यांचे हस्ते महात्मा बसवेश्वराची पूजा करण्यात आली. यावेळी कॅन्टोन्मेंट येथील डॉ. धनंजय गुंड, उद्योजक शंकरराव रासने व सर्व कार्यकारी मंडळातील सभासदांनी बसवेश्वराची पूजा करून प्रसादचे वाटप करण्यात आले.

डॉ. गुंड यांनी महात्मा बसवेश्वराच्या कार्याची महती सांगितली. तसेच तरुण मुला–मुलींना योग्य प्रकारचे वळण लावावे असे सांगितले. यानंतर संजय सपकाळ यांचे देखील उपदेशपर भाषण झाले.

शंकरराव रासने यांनी समाजाच्या या कार्याचे कौतुक केले. धार्मिक अध्यात्मिक सेवा सर्वसामान्य लोकापर्यंत महात्मा बसवेश्वराचा संदेश पोहोचवण्याचे कार्य करावे. आता कोणीही मागास राहिलेले नाही. प्रत्येक समाजात शिक्षित लोक तयार झाले आहेत. याप्रसंगी माजी अध्यक्ष सुभाष हौडगे यांनी बसवेश्वराचे जीवन चरित्र थोडक्यात सांगितले. यावेळी साईराम गारडे यांनी महात्मा बसवेश्वर न्यूज या नावाने युट्युब चॅनल सुरू केलेल्या चॅनेलचा शुभारंभ करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष विठ्ठलराव लोखंडे, प्रकाश तरोडे, भागचंद राऊत, भैय्या गंधे, कार्यकारणी सदस्य अप्पासाहेब हंचे, अशोकराव हरके, सुभाष हौडगे, अजय टकले, सुरेश उदारे, सतीश नरे, वैभव हेबळे, रवींद्र दुगम, बद्रिकेदार उदे, शामराव बोळे, राजाराम मुसळे, प्रकाश भाकरे, विक्रांत कंगे, रवींद्र कंगे, नंदकिशोर कुपाडे उपस्थित होते. अध्यक्ष आप्पासाहेब हंचे यांनी आभार मानले.

# मेहेर नझरमधील अवतार मेहेरबाबांचा ७ मे रोजी फिल्मोत्सव

नगर – अहिल्यानगर येथील झेंडीगेट परिसरातील सरोष पेट्रोल पंपाजवळ असलेले अवतार मेहेरबाबा केंद्र येथे ७ मे रोजी सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान सर्व ईश्वरप्रेमींना अवतार मेहेरबाबांच्या जीवनावर आधारीत मेहेराबाद येथे तयार झालेले लघुचित्रपट दाखविण्यात येणार आहे.

जागतिक प्रिमियरः त्यांच्या वडिलांच्या घरात – सन १९६२ चा पुर्व पश्चिम मेळावाः नव्यानेच आलेला सन १९३२ मध्ये अमेरिका येथे आल्यावर अवतार मेहेर बाबा म्हणाले, ‘’हा माझ्या सर्वात मोठ्या चमत्कारापैकी एक असेल की वास्तविक पश्चिमेस आदर्शवादी पुर्वे सोबत एकत्र आणि मिसळणे; आणि पश्चिम, त्याच्या भौतिक आणि बौध्दिक उत्कर्षाच्या शिखरावर, आणि पुर्व, अवताराच्या रुपात आत्मिक प्रकटतेच्या शिखरावर, एकत्र येतील आणि एकमेकांवर लाजाळु किंवा दुर्लक्ष न करता पाहतील.’’

सन १९५६ पासुन, मेहेरबाबांनी या गहन एकतेसाठी आधारस्तंभ तयार करण्यास सुरुवात केली म्हणजेच त्यांच्या पुर्व आणि पश्चिम अनुयायांचे एकत्र येणे. या दृष्टीकोनाचा समारंभ सन १९६२ मध्ये पुणे, भारतात झालेल्या ऐतिहासिक पुर्व – पश्चिम संमेलनात झाला.

ही दोन तासांची महाकाय चित्रपट त्या दिर्घकाळ प्रतिक्षीत घटनेची कहाणी आहे, जिथे दोन्ही गोलार्धातील भक्त अवताराच्या चरणांवर भेटले. दुर्मिळ उच्च परिभाषा, संग्रहालयातील फुटेज आणि छायाचित्रे, तसेच तिथे असलेल्या लोकांचे पहिलेच अनुभव ज्यात भाऊ कलचुरी, मेहरु ईराणी, जाल आणि डॉली दस्तुर, आर्यविन लक, टेक्स हायटॉवर, भुजोर बोंड आणि इतर आहेत.

ही फिल्म एकता, भक्ति आणि आध्यात्मिक सत्यांची प्रभावी चित्रण आहे. दिग्दर्शक आणि निर्माते रॉबर्ट फ्रेडरिक्स ही फिल्म पाहण्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे.


परदेशातून स्थलांतरित होणाऱ्या ग्रेटर फ्लेमिंगो या दुर्मीळ व नाजूक पक्ष्याला गावातील काही सजग नागरिकांनी मोकाट कुत्र्यांच्या तावडीतून वाचवले.

# ग्रेटर फ्लेमिंगो पक्ष्याला मिळाले जीवदान

### कुत्र्याच्या तावडीतून पक्ष्याला सोडवून वन विभागाकडे सुपूर्द, दाखवलेली जागरूकता आणि संवेदनशीलतेचे कौतुक

नगर – नगर–कल्याण रोडवरील नेप्ती शिवारात ६ मे रोजी एक हृदयस्पर्शी घटना घडली. परदेशातून स्थलांतरित होणाऱ्या ग्रेटर फ्लेमिंगो या दुर्मीळ व नाजूक पक्ष्याला गावातील काही सजग नागरिकांनी मोकाट कुत्र्यांच्या तावडीतून वाचवले. माजी उपसरपंच बाबासाहेब बन्सी होळकर आणि विशाल गडाख यांच्या सतर्कतेमुळे या विदेशी पक्ष्याचे प्राण वाचले असून, त्याला तत्काळ वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले.

होळकर व गडाख हे हिंगणगाव येथे दुचाकीने जात असताना, नेप्ती शिवारात अचानक काही कुत्रे जोरजोरात भुंकताना दिसले. याकडे लक्ष वेधल्यावर त्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता, एक जखमी ग्रेटर फ्लेमिंगो पक्षी त्यांच्या तावडीत होता. क्षणाचाही विलंब न करता, त्यांनी धाडसाने मोकाट कुत्र्यांना हाकलून लावले व पक्ष्याचा जीव वाचवला.

त्यानंतर रामदास फुले यांच्याशी संपर्क साधून मदतीसाठी बोलावले. त्यानंतर फुले यांनी वन विभागाशी संपर्क साधला असता, थोड्याच वेळात प्राणीमित्र हर्षद कटारिया व वन विभागाचे अधिकारी सुभाष हंडोरे आणि संदीप ठोंबरे घटनास्थळी दाखल झाले. ग्रेटर फ्लेमिंगो पक्ष्याची अवस्था गंभीर होती. एका पंखातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता आणि पंखाच्या हाडांना गंभीर इजा झाली होती. त्यामुळे त्याला उडता येत नव्हते. वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्या पक्ष्याला तत्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे प्राथमिक उपचारासाठी हलवण्यात आले.

यावेळी उपसरपंच एकनाथ जपकर, माजी सरपंच संजय जपकर, सोसायटीचे चेअरमन विलास जपकर, संतोष चौरे, यश गडाख, आशिष होळकर, प्रसन्न जपकर, मयूर कोतकर आदी ग्रामस्थ व युवकांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या संवेदनशील आणि मोलाच्या कार्यासाठी वन विभागाने नेप्ती ग्रामस्थांचे आभार मानले.

ग्रेटर फ्लेमिंगो पक्षी दरवर्षी उष्ण हवामानाच्या शोधात अफ्रिकन खंड, इराण व मध्य आशियामधून भारतात स्थलांतर करतात. महाराष्ट्रातील काही जलाशय, खारफुटी भाग आणि ओलसर क्षेत्र हे त्यांच्या विश्रांती व प्रजननासाठी उपयुक्त मानले जातात. उन्हाळ्यात अन्न–पाण्याच्या शोधात हे पक्षी अनेक किलोमीटरचा प्रवास करतात. याच प्रवासात अनेकवेळा ते थकून जखमी होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत प्राणी वा पक्षी संकटात असल्याचे आढळल्यास, नागरिकांनी तात्काळ वन विभागाशी किंवा प्राणीमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

# महेंद्र मधुकर वारे महाविद्यालयाची उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम

नगर – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या एच.एस.सी. फेब्रु २०२५ परीक्षेत शिशु संगोपन संस्था संचालित नगर शहरातील महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयाचा कला, वाणिज्य व विज्ञान बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ८२.७२ टक्के लागला आहे. कनिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत एकूण १९१ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

विज्ञान शाखेचा निकाल ९७.४९, वाणिज्य शाखा ८९.२९ तर कला शाखेचा निकाल ५५.३६ लागला आहे. विज्ञान शाखेमधील रोकडे प्रतिक पांडूरंग या विद्यार्थ्याने ७७.५० टक्के गुण मिळवून प्रथम आला आहे. यास प्रथम क्रमांकाचे रू. ११०० रोख पारितोषिक मिळाले आहे. द्वितीय साठे प्रथमेश प्रमोद ७०.८३ टक्के तृतीय शर्मा नकुल जयेश व खताळ ओम सुधीर ६०.०० टक्के तसेच वाणिज्य शाखेचा निकाल ८९.२९ टक्के लागला असून बागवान तहेसीन कमाल ही विद्यार्थीनी ८२.५० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. हिस प्रथम क्रमांकाचे रू. ११०० रोख पारितोषिक मिळाले आहे व्दितीय शेख मिस्बा मोहम्मद कासिम ७४.१७ टक्के व तृतीय शेंडगे प्रिती प्रकाश ६५.६७ टक्के तर कला शाखेचा निकाल ५५.३६ टक्के लागला असून भुजबळ निकीता भिमराज ही विद्याथीर्नी ७५.३३ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. हिला प्रथम क्रमांकाचे रू. ११०० रोख पारितोषिक मिळाले आहे. व्दितीय क्रमांक भापकर साक्षी सुनिल ६६.०० टक्के तर तृतीय क्रमांक गायकवाड संजना राजेंद्र ६१.५० टक्के हिने पटकाविला आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा.चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत, संस्थेचे विश्वस्त सीए रमेश फिरोदिया, सीए राजेंद्र गुंदेचा, मनुसखलाल पिपाडा, दिपक गांधी, बन्सी नन्नवरे, अभय गांधी, चंद्रकांत आनेचा, सौ. रश्मी येवलेकर, संजय चोपडा, श्रीमती सुमन वारे, अभय गांधी, रमेश मनोत, शिवनारायण वर्मा, विनोदकुमार कटारिया, प्राचार्य दत्तात्रय कसबे, फिरोदिया प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी व सर्व शिक्षकवृंद, पालकांनी यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले आहे.

# ग्रामदैवत खंडोबा यात्रेनिमित्त निंबळकमध्ये ६ ते १० मे दरम्यान टेंनिस बॉल क्रिकेट स्पर्धा



निंबळक – नगर तालुक्यातील निंबळक येथे ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रेनिमित्त ६ ते १० मे दरम्यान ग्रिन हिल स्टेडियम येथे मॉर्निंग क्रिकेट क्लबकडून टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संघाला उद्योजक केतन लामखडे यांचेकडून रु. ७१ हजार व चषक, द्वितीय क्रमांकांसाठी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र कोतकर व प्रदिप कोरडे यांचेकडून रु. ५१ हजार व चषक, तृतीय क्रमांकांसाठी उद्योजक अजय लामखडे यांचेकडून रु. ३९ हजार व चषक, चतुर्थ क्रमांकासाठी अतुल दिवटे व प्रशांत भोजणे यांचेकडून रु. २१ हजार व चषक, तसेच उत्कृष्ट फलंदाजास किरण गायकवाड कडून रु. २१०० व ट्रॉफी, उत्कृष्ट गोलंदाजास अमोल गोसावी कडून रु. २१०० व ट्रॉफी, मॅन ऑफ द सिरीज साठी अनिल भोर कडून रु. ३१०० व ट्रॉफी, ट्रॉफी सौजन्य बी.एम. कोतकर, बॉल सौजन्य महेश म्हस्के व प्रदिप कोतकर, मंडप सौजन्य प्रविण झुगे व मयूर होळकर, पाणी सौजन्य निलेश दिवटे व राहूल सासवडे, समालोचन सौजन्य बाळासाहेब अर्जुन कोतकर, बाळासाहेब माधव कोतकर, रवींद्र आगलावे, युट्यूब सौजन्य बी. डी.कोतकर, अर्जुन कोतकर, दत्ता कोतकर, अमोल गारुडकर, गिताराम खपके, अनिल पवार यांचेकडून करण्यात येणार आहे.

# विधवा व ज्येष्ठांच्या समस्या समजून त्यांची मदत करण्याची आवश्यकता

### हनीफ शेख यांचे प्रतिपादन; अहमदनगर मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने शंभर विधवांना मदतीचे धनादेश वाटप

नगर – समाजामध्ये आज प्रत्येकाला काही ना काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पण वयस्कर व त्यात पण विधवा महिलांच्या समस्या फार मोठ्या प्रमाणात आज निर्माण झाले आहे. त्यावर उपाय व त्यात पण विधवा ज्येष्ठांची मदत करण्याची आज अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन स्नेहालय बाल भवनचे हनीफ शेख यांनी केले.

अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने १०० विधवा महिलांना मदतीचे धनादेश हनीफ शेख यांच्या हस्ते कोटला येथील कार्यालयात वाटप करण्यात आले. याप्रसंगी इंजि. इकबाल सय्यद, डॉ. सईद शेख, हाजी मिर्झा आदी उपस्थित होते.


अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने १०० विधवा महिलांना मदतीचे धनादेश हनीफ शेख यांच्या हस्ते कोटला येथील कार्यालयात वाटप करण्यात आले.

विधवांना मदतीचे उपक्रम फाउंडेशन मागील आठ वर्षापासून सलग राबवत आहे.

हनीफ शेख पुढे म्हणाले की, आपल्या देशात विधवा व ज्येष्ठांचे भरपूर समस्या आहे. त्याकडे आपल्याला जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात घरच्याकडूनच ज्येष्ठांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे त्या बाबींचा उहापोह होत नाही व परिणामी ती व्यक्ती डिप्रेशनमध्ये जाते किंवा घरातून निघून जाते, आजारी पडते, काहीही होऊ शकते. म्हणून प्रत्येकाने आपल्या व समाजातील विधवा, ज्येष्ठांची देखभाल केली पाहिजे. त्यांच्याशी बोलत रहावे. त्यांची विचारपूस करायला हवी असे नमूद करून फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले.

सूत्रसंचालन डॉ. सईद शेख यांनी केले. हाजी मिर्झा यांनी आभार मानले.

# २०२६ च्या चातुर्मासाची तयारी आजपासूनच करा



श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्रीसंघाने येथील केशर गुलाब मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या मंगल प्रवचन सोहळ्यात बोलताना प्रविणऋषीजी म.सा.

**प्रविणऋषीजी म.सा. यांची आज्ञा**

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने २०२६ साली आनंदधाममध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या चातुर्मासाची पूर्व तयारी आजपासूनच करा, अशी आज्ञा श्री प्रविणऋषीजी म.सा. यांनी देताच उपस्थितांनी एका सूरात होकार भरला. सर्वांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्रीसंघाने येथील केशर गुलाब मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या मंगल प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. आदेश चंगेडिया यांनी २०२६ च्या शिखर चातुर्मास तयारीचा श्रीगणेशा आजपासून करण्यात येत आहे, असे सांगताना ज्यांना कार्यक्रम नियोजनाची आवड असेल आणि आपले कौशल्य पणास लावून योगदान देण्याची इच्छा असेल त्यांनी मोबाईलवर गुगल फॉर्म भरून द्यावेत. हा चातुर्मास अभूतपूर्व, भक्तीपूर्ण करताना जैन संघटन उभारण्यावर लक्ष्य केंद्रित केले जाईल. १४ वर्षांपासूनच्या युवकांना चातुर्मास नियोजनात प्राधान्याने सहभागी करून घेतले जाणार असल्याने त्यांना नियोजन कसे करण्यात येते? याचे सप्रात्यक्षिक ज्ञान मिळेल. व्यवस्थापन कौशल्य प्राप्त होईल. जैन धर्मातील चातुर्मासाची बारकाईने माहिती मिळेल. यामुळे आपल्या जैन धर्माशी कसे एकनिष्ठ रहावे, हे लक्षात येईल. संपूर्ण समाज एकत्रित आल्याने लहान, किशोरवयीन, युवक आणि ज्येष्ठ अशा सर्वांना जैन धर्म आपलासा वाटेल. समाज संघटन घेताना बंधुत्व व वात्सल्यभाव वाढून अहिल्यानगर जिल्ह्यातील जैन धर्मीयांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल. असे आदेश चंगेडिया यांनी सांगितले. बाबुशेठ बोरा यांनी आभार मानताना या शिखर चातुर्मासात जैनेतरांना संकल्पपूर्वक जोडण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

श्री प्रविणऋषीजी पुढे म्हणाले, आर.एस.एस.चे संघटन कार्य पहा. हेडगेवार, गोळवलकर आणि देवरस यांनी आखून दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे आजही कार्य सुरू आहे. आर.एस.एस.आणि इतर संघटना यामध्ये खुप अंतर आहे. आर.एस.एस.चा एक कार्यकर्ता दहा कार्यकर्ते उभे करतोच. आज आर.एस.एस.चे एक लाखापेक्षा अधिक प्रोजेक्ट नियोजनबध्दतेचे दर्शन घडवत शिस्तीत सुरू आहेत. आपल्याला अशा पध्दतीनेच कार्य करायचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कोवळ्या वयात हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते साकारताना जीवन समर्पण केले. त्यांनी निर्माण केलेले साम्राज्य पुढील पिढीने जतन केले असते तर आज देश गुलाम झाला असता का? असा सवाल श्री प्रविणऋषीजींनी केला.

धर्मगुरू असूनही समाजातील समस्या सुटल्या का? तुमच्यावर संकट आले तर तुमचा वाली कोण? तुमच्या पाठिशी उभे राहणारे कोण? अशी प्रश्नांची सरबत्ती करत श्री प्रविणऋषीजींनी या स्थितीत बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. ते पुढे म्हणाले, गुरूदेवांनी सांप्रदायिक व्यवस्था समाप्त करत वेगळेपणाने संघटन निर्माण केले. जैनांवर कोणतेही संकट आले तर आपले संपूर्ण नेटवर्क ॲक्टीव्ह व्हावे. आपण सगळे एकदिलाने एकत्रित राहिलो तर आपले एकमत होऊन संकटावर सहजपणे मात करू शकू. सोशल मिडियावर झळकणारे ठोस कार्य करू शकत नाहीत. आज मिडिया विकत घेता येतो. अशा प्रसिध्दीपेक्षा कार्य महत्वाचे आहे.

राहुरी येथे मी भगवान महावीर नामकरण महोत्सवाचा शुभारंभ केला आहे. एकत्रितपणे नामकरण समारंभाचे आयोजन व्हावे या हेतूने हा महोत्सव सुरू केला. यातून समाजातील आपलेपणा वाढेल. आपण नेहेमी इतरांच्या कामाबद्दल बोलतो पण मी काय करायला पाहिजे? यावर विचारही करत नाही. चातुर्मासात सामायिक, प्रतिक्रमण, मंगलपाठ यापेक्षा वेगळे काही करता का? दुनियेतील एक तृतियांश आबादी जैन बनवणे, हे माझे लक्ष्य आहे. तुमचे जैनेतर मित्र चातुर्मासात सहभागी करून घ्या. मी जैन धर्माची दीक्षा विधीवत देणार आहे. नवकार कलश इस्कॉनच्या लेव्हलने सर्वदूर पोहोचला पाहिजे. प्रत्येकाच्या गळ्यात अर्हम दिसले पाहिजे. ज्ञानेश्वरीसारखी जैनेश्वरी घराघरात गेली पाहिजे. एकलव्यासारखे लक्ष्यावर लक्ष ठेवून काम करा. २०२६ चा चातुर्मास गर्भसंस्कार ते ज्येष्ठ नागरिक असा सर्वांसाठी असेल, असे श्री प्रविणऋषीजींनी सांगितले.

तिर्थेषऋषीजी म.सा.यांचे गुरूभक्तीपर विचार उपस्थितांना प्रभावित करणारे ठरले. त्यांचे स्वरचित गीत गायन भान हरपून टाकणारे होते. अनेकांनी त्यांच्या सुरात सूर मिसळत गाण्याचा आनंद लुटला.

श्री प्रविणऋषीजींची विहार व्यवस्था विलास कटारिया एवम् सपना कटारिया यांनी पाहिली. प्रवचन सोहळ्यास श्री सकल संघासह अशोक (बाबुशेठ) बोरा, आदेश चंगेडिया, राजेश भंडारी, सुनिल मुनोत, अनिल पोखरणा, प्रफुल्ल पारख, विलास कटारिया, सुरेश कांकरिया, संतोष शेटीया, सचिन देसरडा, अनिल कटारिया, विजय गुगळे, संदिप गांधी, पोपटलाल कटारिया, अरूण दुगड, सुभाष मुथ्था, आनंदराम मुनोत, रतीलाल कटारिया आदी तसेच शहरातील आणि उपनगरातील श्रावक–श्राविका उपस्थित होत्या. महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.



हिंदुत्ववादी प्रवक्त्या काजल हिंदुस्थानी यांनी जय आनंद फाउंडेशनच्या सदस्यांशी संवाद साधला.

# हिंदूंना सुरक्षितपणे राहण्यासाठी एक होणे हाच सर्वात मोठा पर्याय

**काजल हिंदुस्थानी यांचे प्रतिपादन; जय आनंद फाउंडेशन व भारत भारतीच्या सदस्यांशी संवाद साधून व्यक्त केले मनोगत**

नगर – आज भारतात मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. काही समाज जाणूनबुजून हिंदूंना लक्ष्य करत आहेत. हिंदूंना सुरक्षितपणे राहण्यासाठी एक होणे हाच सर्वात मोठा पर्याय आहे. यासाठी तनमनधनाने हिंदू धर्मासाठी काम करा व जे हिंदू रक्षणासाठी लढत आहेत त्यांना सहकार्य करा. हिंदूंच्या मुली इतर धर्मात जाणार नाहीत याची खबरदारी घेण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. अधर्म पसरवणाऱ्यांवर सर्वांनी बहिष्कार टाकून त्यांच्या कडून कोणतीही वस्तू, भाजी, फळे खरेदी करू नका. या अधर्माला विरोध करण्यासाठी नारी शक्तीने जागरूक होणे आवश्यक आहे. कारण नारीतच खूप ताकद आहे. तिचा वापर वेळीच झाला पाहिजे. मुलींना कमजोर न ठेवता सक्षम करून स्वसंरक्षण शिकवा, असे प्रतिपादन हिंदुत्ववादी प्रवक्त्या काजल हिंदुस्थानी यांनी केले.

काजल हिंदुस्थानी यांनी नुकतीच अहिल्यानगरला धावती भेट दिली. यावेळी जय आनंद फाउंडेशन व भारत भारतीच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी काजल हिंदुस्थानी यांनी दोन्ही संस्थांच्या सदस्यांशी संवाद साधून मनोगत व्यक्त केले. यावेळी फाउंडेशन अध्यक्ष अमित काबरा, संस्थापक कमलेश भंडारी, भारत भारतीचे माजी अध्यक्ष के. के. शेट्टी, रमेश रासने, महिला अध्यक्षा विनया शेट्टी, मधु भंडारी, स्विटी पंजाबी, शामली रासने व बजरंग दलाचे कुणाल भंडारी आदींसह सदस्य व महिला उपस्थित होते.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी यांनी जय आनंद फाउंडेशन व भारत भारतीच्या विविध कार्याची व राष्ट्रीय उपक्रमांची माहिती देऊन काजल हिंदुस्थानी यांच्या कार्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी फाउंडेशनचे सचिन कटारिया, रितेश पारख, गौरव बोरा, गौतम मुथा, रोहित चुत्तर, विनोद कटारिया, विलास कटारिया, सुमीत लोढा, प्रणिता भंडारी, पूजा बोरा, कीर्ती कटारिया, श्रेया देशमुख, नयना भंडारी, प्रांजल गांधी, सौ. सिंग यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# ‘आशा भोसले...द सिंगिंग आयकॉन’ या गितांचा नगरच्या माऊली सभागृहात १० मे रोजी कार्यक्रम



नगर – गायिका आशा भोसले यांनी गायिलेल्या सुमधूर गीतांची मेजवाणी संगीत रसिकांना लवकरच मिळणार आहे. नगरची युवा कलाकार प्रणाली धर्माधिकारी यांची प्रस्तूती असलेल्या ‘आशा भोसले...द सिंगिंग आयकॉन’ हा बहारदार गितांचा कार्यक्रम १० मे रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडीतील माऊली सभागृहात होणार आहे.

गायिका आशा भोसले यांनी गायिलेली असंख्य गाणी लोकप्रिय झाली आहेत. त्यातील निवडक गितांचे सादरीकरण या वेळी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला वाजिद खान यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. गायकांना दीपक काळे व ललित भूमकर संगीताची साथसंगत देणार आहेत. सूत्रसंचालक सुशील चोरगे हे कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

रसिकांनी प्रवेशिकांसाठी ७९७२५३३६१७, ८६६८५४८३८१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रणाली धर्माधिकारी यांनी केले आहे.

# दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेचा १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा ८३.३३ टक्के निकाल



नगर – येथील दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयामध्ये प्रथम क्रमांकाने देशमुख आदित्य वैभव व कराळे तनवी अशोक ७५.८३ द्वितीय क्रमांकाने खंडेलवाल वल्लभ अनिल ७५.६७% तर तृतीय क्रमांकाने साबळे प्राची आनंदा ७५ टक्के हे विद्यार्थी विद्यालयामध्ये प्रथम आले.

वाणिज्य शाखेमध्ये प्रथम क्रमांक कुलकर्णी क्षितिज मकरंद ८२.३३, द्वितीय क्रमांक काळे पुष्कराज अमित ७४.१७%, तृतीय क्रमांक भगत वेदांत योगेश ७२.७% ने विद्यार्थी प्रथम आले असून त्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विजया रेखे, माजी अध्यक्ष दि. ना जोशी, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सेक्रेटरी किरण वैकर, खजिनदार व प्रगत विद्यालयाचे चेअरमन उमेश रेखे, कार्यकारणी सदस्य महेश रेखे, उदयकुमार भणगे, ॲड. रमेश नगरकर, तसेच प्राचार्य सुनिल पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या खडके, प्राध्यापिका हर्षाली देशमुख व शिक्षक शिक्षकेतर वृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **१. विमलबाई गुणवंतराव देशमुख २. गुणवंतराव विठ्ठलराव देशमुख, दोघेही रा. फ्लॅट नं. जी १ समर्थ गार्डन सर्व्हे नं. ५०/१, इमराईड सिटी जवळ, नाथ परनगन गारखेडा औरंगाबाद.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - डि.।। अहिल्यानगर / अहमदनगर सब. डि.।। ता. राहुरी पैकी अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे बारागांव नांदुर** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| | ग.नं. | हे. आर. | रु. पै. |
|---|---|---|---|
| अ) | ३९३/१ | ०–७८ | २–०० |
| | | ख. ०–१२ | |
| | | ०–९० | |

विद्यमान मालक नं.१ यांच्या मालकीची संपुर्ण जमीनीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – गट नं.३९४/१   दक्षिणेस – गट नं.३९३/२ पैकी सांगळे यांची मिळकत
पश्चिमेस – गट नं.३९१ पैकी   उत्तरेस – राहुरी बारागाव नांदुर डांबरी रस्ता

| | ग.नं. | हे. आर. | रु. पै. |
|---|---|---|---|
| ब) | ३९४/१ | ०–८८ | २–२५ |
| | | ख. ०–१२ | |
| | | १–०० | |

विद्यमान मालक नं. २ यांच्या मालकीची संपुर्ण जमीनीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – शिवरस्ता   दक्षिणेस – गट नं.३९४/२ पैकी सांगळे यांची मिळकत
पश्चिमेस – गट नं.३९३/१   उत्तरेस – राहुरी बारागाव नांदुर रस्ता

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ०६/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८


# पंजाबी व सिख समाजातर्फे ११ मे रोजी पुणे येथे वर-वधु परिचय संमेलन

नगर – पंजाबी वेलफेअर फौडेंशन, गुरुद्वारा ओल्ड येज होम आकुर्डी गुरव्दाराच्या पाठीमागे, निअर आकुर्डी रेल्वे स्टेशन येथे ११ मे रोजी होणार आहे, अशी माहिती हरिष मदान – ९३२५६५५९१४२, सुरेंद्र वाधवा ८६००८६६०००, लिना सप्रा ९८६०६०७१२७, व किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१ संगीता वोहरा ९१४६८१०००७, योगीता भाटीया ९१४५४५६७२४ यांनी दिली.

ज्यांना सदर परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्या सोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी द पंजाबी हिंदू असोसिएशन, जबलपूर, नरेंद्र पाल मलिक ९९७७७१६०७७, उमेश खुराना ८०८५९५९८४९ पंजाबी समाज समिती कोटा वीर वधवा ९४९४२२७१२७ परवेश गुलाटी ९४१४५२०६६४ द पंजाबी असोसिएशन सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे अरुण चोपडा मो. नं. ९६२३११६१७०, संगिता मल्होत्रा मो.नं. ९९२४४२९७१४, किशोर कंत्रोड (अ.नगर) मो.नं. ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ हैदराबाद पंजाबी सेवा समिती विनित अरोरा ९२४६१०००००, रोमया अरोरा ९२४६३७८९९१, ऑफिस ८१२५७४९९६५, सुरत पंजाबी समाज, राधाकृष्ण मंदिर, गेटवे हॉटेल जवळ, पारले पॉईट, ऑफिस ८१४००५५५८८, नरेश सेठ ९३७७७२२२००, कैलाश छाबडा ९३७४४२१२८०, नागपूर सनातन भवन, प्रेमनाथ सहानी ९८२२२०४०५७, नरेंद्र सेठिजा ९८९०३३४७४७ अमदाबाद पंजाबी बिरावी, नवरंगपुरा चॅरीटेबल ट्रस्ट तर्फे पंजाबी सेवा समाज हॉल, किशोर महेदिरता ९८२५०३५८२०, ठाकूर खुराना ९७२४६५९६१६, भोपाल पंजाबी समाज, मोहनसिंग कालारा ७०००४३२६०६, शशि वैद – ९३०३०७९४४६, इंदोर पंजाबी समाज, बलराज सबलोक ९६४४४७१०८९, श्वेता खत्री ७३५४६१९९६०, विजय ग्रोवर ९४२५४८०७०९, नाशिक, किरण कालरा ९४२२७४६६८५, अशोक ग्रोवर – ९५२७४७२४७९, पुणा कॅम्प गुरुद्वारा, पुणे विक्रम सिंग कांह १९२२९३१८८०, उत्तर प्रदेशचे खत्री समाजचे अध्यक्ष आचल महरोत्रा ९५५५४११०९२, सिंकदराबाद गुरुव्दारा साहेब, नियर रेल्वे स्टेशन जवळ सिंकदराबाद बलदेवसिंग बग्गा ९८४८०४४४४५, हैदराबाद गुरुद्वारा साहेब बहरमबाला सिख छवणी हैदराबाद सुखदेव सिंग ९९४१६२२५३३, अहिल्यानगर किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन हरीष मदान, मोहन सिंग कालरा, सुरेंद्र वाधवा, अरुण चोपडा, किशोर महेदिरता, नरेंद्र सेतीजा, प्रेमनाथ सहानी, नरेश सेठ, विनित अरोरा, किशोर कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, प्रदिप पंजाबी, यांच्या वतीने करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व विनंतीनुसार या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक **सौ. रत्नमाला अनिल खिवंसरा,** रा. शान हाईटस, मंगळवार पेठ, पुणे यांनी सदरहू मिळकत आमच्या आशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे त्यांनी आमचे आशिलास सदरहू मिळकत पुर्णपणे त्यांना विकण्याचा अधिकार असून ती पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याबद्दल आमच्या आशिलास त्याची विश्वास व हमी दिली आहे. या उपरोक्त सदरहू मिळकतीवर कोणाचेही कुठल्याही प्रकारे काही एक साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस जामिन, अन्नवस्त्र पोटगी, लिज, अदलाबदल, जनरल मुखत्यार, कौटुंबिक अदलाबदल, वाटप, वाटपाबद्दल वाद वगैरे किंवा कुठल्याही बँक सोसायटी, कोर्ट यांचा दावा अगर बोजा नोटी, क्लेम, मनाई, जप्ती वगैरे, हक्क अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत आम्हाला वरिल पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याचे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचेही कुठल्याही प्रकारे काहीएक तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही. आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून मुद्दाम ही नोटीस दिली असे.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :-**

मिळकतीचे वर्णनः डि. अहमदनगर सब डि. व ता. नगर पैकी मौजे चाहुराणा बु. येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील टी, पी. स्किम नंबर ३ मधील सर्व्हे नंबर ३८ / २अ, फायनल प्लॉट नंबर ५१/पी, सब प्लॉट नंबर २ याचे क्षेत्र ५२५०.०० चौ. फुट ४८७.९१ चौ. मिटर

या प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे.
पुर्वेस – प्लॉट नंबर ३.   दक्षिणेस – प्लॉट नंबर ७.
पश्चिमेस – बुरुडगांव रोड   उत्तरेस – ६० फुटचा टी.पी. रस्ता.

या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या सपना अपार्टमेंट या बहुमजली इमारतीपैकी पहील्या मजल्यावरील अपार्टमेंट नंबर ४, यात तीन रुम बाल्कनी पॅसेज सह याचे बिल्ट अप क्षेत्रफळ ५५० चौ. फुट ५१.११ चौ. मिटर) व कॉमन एरियाज व फॅसिलीटीज मधील कॉमन शेअर ११.३% यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे–
पुर्वेस – अपार्टमेंट नंबर ९   दक्षिणेस – ओपन स्पेस.
पश्चिमेस – ओपन स्पेस   उत्तरेस – अपार्टमेंट नंबर ११.

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक फ्लॅट मिळकत सर्व वागणुकीच्या वहीवाटीच्या सर्व हक्कासह तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखून न ठेवता.

येणे प्रमाणे चतु:सिमापूर्वक तदंगभुत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा, वागवहिवाटीसह तसेच भविष्यातील सर्व लाभ अधिकारासह असलेली मिळकत.

नोटीस दिली असे.

दि. ०६/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. विजय बी. मुनोत**
ॲडव्होकेट अँड टॅक्स कन्सल्टंट
नोटरी पब्लिक (गव्ह. ऑफ इंडिया)
बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहमदनगर
फोन २३४६८९७, मो. ९८५०८७३१५३




भिंगार ब्राह्मण सभेतर्फे मौंजीबंधन कार्यक्रम उत्साहात पार पाडला.

# भिंगार ब्राह्मण सभेतर्फे मौंजीबंधन कार्यक्रम उत्साहात

नगर – भिंगार येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामुदायिक मौंजीबंधन संस्कार करण्यात आले. भिंगार ब्राह्मण सभेतर्फे हा उपक्रम राबविण्यात येतो. यावर्षी या सोहळ्यामध्ये ६ बटूंची हजेरी होती. मौंजीबंधनातील सर्व पवित्र संस्कार सूर्यकांत देशमुख उर्फ नानामहाराज यांनी केले.

सौ. प्रियंका व अभय लक्ष्मीकांत एडके (खांडकेकर) यांचे चिरंजीव हर्ष, सौ. मनिषा व अतुल लक्ष्मीकांत एडके (खांडकेकर) यांचे चिरंजीव रितेश उर्फ संस्कार, सौ. मंजुश्री व लक्ष्मीकांत विष्णु कुलकर्णी (तामसवाडीकर) यांचे चिरंजीव पद्मेश, श्रीमती कुंदा व (कै) दत्तात्रय जाखडे यांचे चिरंजीव श्रीकांत, सौ. सोनाली व श्यामराव जाखडे यांचे चिरंजीव शुभंकर तसेच सौ. वृष्टी व विक्रम एकबोटे यांचे चिरंजीव प्रज्वल यांच्या या कार्यक्रमात मौंजी लावण्यात आल्या.

सकाळी पहाटेच सुरू झालेल्या या सोहळ्यामध्ये सर्व बटूंचे चौल, मातृभोजन आणि मिरवणूक व संपूर्ण संस्कार विधी पार पडले. यशस्वीतेसाठी भिंगार ब्राह्मण सभाध्यक्ष डॉ. विलास देशमुख, उपाध्यक्ष किरण मुळे, सचिव विनोद देव, खजिनदार संजय मुळे यांच्यासह सुधीर वाळुंजकर, चंद्रशेखर चौधरी, अनिल आवटी, सुनील देशमुख, सतीश प्रभुणे, प्रदीप मुळे, चंद्रशेखर देशपांडे, चेतन वसगडेकर, तेजस देशमुख, जयदीप धर्माधिकारी, पुरुषोत्तम व्यवहारे आदींनी परिश्रम घेतले. भिंगारमधील खळेवाडीतील देशमुख सांस्कृतिक हॉलमध्ये झाला.

# कलेला वेदनेपेक्षा संवेदना आवश्यक आहे

**संगीतकार कौशल इनामदार**



श्रुती संगीत निकेतन या संस्थेने आयोजित केलेल्या कौशलवाणी एक सुरेल श्रुती संवाद या कार्यक्रमात कला सादर करताना संगीतकार कौशल इनामदार आणि सहकलाकार.

नगर – कोणत्याही कलेला वेदनेपेक्षा संवेदना आवश्यक आहे, असे प्रतिपादन संगीतकार कौशल इनामदार यांनी केले आहे.

श्रुती संगीत निकेतन या संस्थेने आयोजित केलेल्या कौशलवाणी एक सुरेल श्रुती संवाद या कार्यक्रमात ते बोलत होते. मुलाखत, गाणी गप्पा अशा या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात पत्रकार अभय नरहर जोशी आणि गायिका अभिनेत्री डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. मराठी अभिमान गीत, हीच अमुची प्रार्थना, परवारदिगार या आणि अशा लोकप्रिय गीतांच्या मागची जन्मकथा, प्रेरणा यांविषयी त्यांनी मनोरंजक आणि उद्बोधक पद्धतीने विवेचन केले. गीतकार अशोक बागवे यांच्या काव्याशी आपले सूर कसे जुळले याचे प्रतिपादन इनामदार यांनी केले.

अहिल्यानगरमधील संगीत शिकणारे विद्यार्थी संकेत शाह, वेदांत कुलकर्णी, शौनक कुलकर्णी, समर्थ कोर्टीकर, संदेश बेलदार, विठ्ठल महापुरे, श्रावण शिंदे, माधवी ऋषी, अनुजा कुलकर्णी, प्रतिक्षा काळे, आर्या कुलकर्णी, स्वराली जोशी, रिद्धी कुलकर्णी यांनी मराठी अभिमान गीत सादर केले आणि स्वतः कौशल इनामदार यांनी विद्यार्थ्यांसमवेत हे गीत म्हटले. रसिकांच्या खास आग्रहावरून त्यांनी बालगंधर्व चित्रपटातील चिन्मया सकल हृदया हे पद त्यांनी भावपूर्णपणे सादर केले. अतिशय रंगलेल्या शब्द सुरांच्या या मैफलीत तबला वादक शेखर दरवडे यांनी तबला साथ दिली. डॉ. हृषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी हेमंत काळे, सविता काळे, दीपा पारनाईक, माधुरी माचवे यांचे सहकार्य लाभले.

या प्रसंगी प्रवीण कुलकर्णी, देवाशीष शेडगे, कुमुदिनी बोपर्डीकर, अशोक गांधी, पवन नाईक, मोहिनीराज गटणे, श्रीराम तांबोळी, चंद्रकांत पंडित, महेश खोपटीकर, लक्ष्मणराव डहाळे उपस्थित होते.

# भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या बारावी बोर्डाचा शंभर टक्के निकाल

**वैष्णवी मेहेत्रे व आर्यन बोरा शाळेच्या गुणवत्ता यादीत प्रथम**

नगर – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यावर्षी देखील संख्यात्मक व गुणात्मक निकाल सर्वोत्कृष्ट लागला आहे.

वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५०% गुण मिळवून सायन्स विभागात विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर आर्यन कैलास बोरा याने ९५.६७% गुण मिळवून कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच आर्यन कैलास बोरा, प्रेम आनंद कोठारी, पार्थ मंगेश चंगेडिया, स्मित संतोष गुगळे या विद्यार्थ्यांनी बुक कीपिंग ॲण्ड अकाउंटन्सी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. त्याचप्रमाणे गणित व आयटी विषयांमध्ये आर्यन कैलास बोरा याने शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच गुणानुक्रमे विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अभय फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळाचे सदस्य तसेच विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक पोपट पवार, पर्यवेक्षक बाळू वाव्हळ, विष्णु गिरी, कैलास साबळे यांनी केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जोश



## ‘ॲपल’चा ‘व्हॉट्सॲप’मध्ये मेसेज ट्रान्सक्रिप्शन फीचर

**टेक टॉक**

‘व्हॉट्स ॲप’ने नोव्हेंबर २०२४ मध्ये व्हॉईस मेसेज ट्रान्सक्रिप्शन हे फीचर सादर केलं होतं. आता कंपनी या फीचरमध्ये काही महत्त्वाचे बदल करण्याची तयारी करत आहे. त्यात ग्राहकांना अधिक कंट्रोल्स दिली जातील. या नवीन अपडेटची सध्या ‘आयफोन’वर चाचणी केली जात आहे. एका अहवालानुसार, ‘व्हॉट्सॲप’ आयफोनच्या ग्राहकांसाठी नवीन कंट्रोल्सवर काम करत आहे. याद्वारे त्यांना कधी आणि कोणते व्हॉइस संदेश ट्रान्सक्रिप्ट करायचे आहे हे ठरवता येईल. आत्तापर्यंत हे फीचर सुरू केल्यावर प्रत्येक व्हॉईस संदेशाचे ट्रान्सक्रिप्शन केले जात होते; परंतु नवीन अपडेटनंतर, ग्राहकांना हवं तर प्रत्येक व्हॉइस मेसेजचे ट्रान्सक्रिप्शन आपोआप मिळू शकेल किंवा कोणत्या मेसेजला ट्रान्सक्रिप्शन आवश्यक आहे, ते मॅन्युअली निवडण्याचा पर्याय असेल. ग्राहकाने मॅन्युअल मोड निवडल्यावर त्याला व्हॉइस मेसेज बबलमध्ये एक नवीन बटण दिसेल. या बटणावर टॅप करून तो त्या विशिष्ट व्हॉइस मेसेजचे ट्रान्सक्रिप्शन मिळवू शकेल.

## पंखात झेपावण्याचे बळ!

**अचिव्हर**



गावात रेशनचं छोटंसं दुकान चालवणाऱ्या वडिलांसाठी कुटुंबाचा उदरनिर्वाह करणं हीच मोठी गोष्ट असतं. अशा परिस्थितीत आपल्या मुलीला पायलट बनवण्याचं स्वप्न पाहणं फारच दूरचं. मोती उल हक यांची मुलगी तैयबाने त्यांना ‘मला पायलट बनून आकाशात उडायचे आहे’, असं सांगितलं. आपल्या मुलीची जिद्द पाहून त्यांनी तिला पायलट बनवण्याचा निर्णय घेतला. मात्र, या दोघांनाही आपल्या संसारापेक्षा मोठं स्वप्न पाहण्यासाठी सामाजिक कुरबुरी, आर्थिक संघर्ष आणि इतर अनेक आव्हानांना तोंड द्यावं लागलं, तरी तैयबाने जिद्द, अढळ विश्वास आणि मेहनतीने प्रत्येक अडथळ्यावर मात केली.



**छोट्याशा गावात वाढलेल्या तैयबा**

अफरोजचा गावच्या वाटेपासून हजारो फूट आकाशात उडण्यापर्यंतचा प्रवास एखाद्या चित्रपटात शोभण्यासारखा आहे. आज ती केवळ कॉकपिटमध्ये बसून विमान उडवत नाही, तर संपूर्ण पिढीला कोणतंही स्वप्न पूर्ण करता येतं, असा विश्वास ठेवण्यास प्रेरित करते.

**लहान गाव, मोठी स्वप्ने**

तैयबा बिहारमधील सारणमधील जलालपूर या छोट्याशा गावातील निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. वडील रेशनचं छोटं दुकान चालवतात आणि आई सॅमसन निशा गृहिणी आहे. दुकानातून संपूर्ण कुटुंबाचा खर्च भागवणं कठीण झालं होतं. कोरोनाकाळात त्यांचं दुकान बंद झालं तेव्हा आव्हानं आणखी वाढली; मात्र वडिलांनी मुलांना चांगलं शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. तैयबा थोडी मोठी झाल्यावर वडिलांनी गावातल्या शाळेत दाखल केलं. बारावीचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर तिने वडिलांकडे पायलट होण्याची इच्छा व्यक्त केली.

ती अभ्यासात नेहमीच अव्वल असायची. त्यामुळे वडिलांनीही होकार दिला; पण खरी अडचण होती, फीच्या पैशाची. आपल्या मुलीच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी आईने आपली शेतजमीन विकली. तैयबाचा भुवनेश्वरमधील सरकारी विमान प्रशिक्षण संस्थेत जाण्याचा पहिला अडथळा पार केला; पण अडचणी संपण्याची चिन्हं दिसत नव्हती. पित्ताशयातील खड्यांमुळे तिला वैद्यकीयदृष्ट्या अनफिट घोषित करण्यात आलं.

तिने पायलट होण्याचं प्रशिक्षण नुकतंच सुरू केलं होतं. शस्त्रक्रिया झाल्यानंतर ती पुन्हा प्रशिक्षण घेण्यासाठी भुवनेश्वरला गेली; पण इथेही तिला अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. तिने सुमारे ८० तासांचा उड्डाणाचा अनुभव घेतला, तेव्हा प्रशिक्षक वैमानिकाचा मृत्यू झाला. तिच्या मनावर या घटनेचा खूप आघात झाला. तिला तिचं प्रशिक्षण सोडून द्यावं लागलं; परंतु घरच्यांच्या पाठिंब्यामुळे ती त्यावर मात करू शकली. तैयबाने ‘इंदूर फ्लाइंग क्लब’मध्ये प्रवेश घेतला आणि प्रशिक्षण सुरू केलं. आधीच ऐंशी तासांचं प्रशिक्षण पूर्ण केलं असल्याने, तिने उर्वरित १२० तासांचं प्रशिक्षण पूर्ण केलं आणि पायलटचा परवाना मिळवला. परवाना मिळाल्यानंतर तिने सारण जिल्ह्यातील दुसरी महिला पायलट आणि जलालपूरची पहिली महिला पायलट बनण्याचा मान मिळवला.

**सामाजिक विरोधाचा सामना**

पायलट होऊनही तिचा संघर्ष संपला नाही. एकीकडे लोक तिच्या यशाचा आनंद साजरा करत असताना दुसरीकडे काही कट्टरपंथी लोक मुस्लिम धर्मातील महिलांनी असे कपडे घालणं हराम असल्याचं सांगत होते. तैयबाने पायलटचा ड्रेस घालू नये, असं त्यांचं म्हणणं होतं. त्यावर तैयबाने कट्टरवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर दिलं आणि सांगितलं की, मुलींची ओळख कपड्यांवरून बनवण्याऐवजी आपल्या बुद्धिमत्तेने ओळख बनवली पाहिजे.

कुटुंबाचा पाठिंबा आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यामुळे जीवनातील कोणतंही ध्येय गाठता येतं. यश हे कोणत्याही ठिकाणावर किंवा परिस्थितीवर अवलंबून नसतं. अपयश ही यशाची पहिली पायरी मानली जाते. आव्हानांशी लढतात, तेच आपले ध्येय साध्य करतात. अशी कोणतीही समस्या नाही जी प्रयत्नाने सोडवली जाऊ शकत नाही, हा धडा तिने घालून दिला.

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

### व्हॉट्स न्यू?




**स्मार्टवॉच टिपणार हातांच्या हालचाली**

स्मार्टवॉच आता जास्त स्मार्ट होणार आहे. हे वॉच युजरच्या हातांच्या हालचाली टिपून त्याच्या कामांची माहिती घेईल. यामुळे स्मार्टवॉचला कनेक्ट असणारी हेल्थ ॲप्स युजरच्या आरोग्याचं अधिक चांगल्या प्रकारे विश्लेषण करू शकतील. ‘कार्नेगी मेलन’ विद्यापीठात याबाबतचं संशोधन करण्यात आलं. यात ५० जणांवर हा प्रयोग करण्यात आला. त्यांना नवं तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात आलेलं स्मार्टवॉच घालण्यात आलं. हातांच्या हालचाली टिपून त्यांच्या दिनचर्येबाबत माहिती घेण्यात आली. हे तंत्रज्ञान भविष्यात उपयुक्त ठरू शकेल.

### स्मार्ट टिप्स

**असा शोधा फोन**

आपला सायलेंट मोडवरचा मोबाइल सापडत नसेल तर या टिप्स फॉलो करा.



‘अँड्रॉइड डिव्हाइस मॅनेजर’ तुमच्या कामी येईल.यासाठी दुसऱ्या मोबाइल फोनवर इंटरनेट ब्राउजर ओपन करा. ‘फाइंड माफ फोन थ्रू अँड्रॉइड डिव्हाइस मॅनेजर’ टाईप करा. आता तुम्हाला तुमच्या जी मेल खात्यात साईन इन करावं लागेल. फोनमधल्या आयडीचा वापर करा. काही सूचना असतील तर ओके म्हणा. इथे ‘रिंग’, ‘लॉक’ आणि ‘इरेज’ हे ऑप्शन्स दिसतील. त्यातल्या ‘रिंग’वर क्लिक करा. आता फोन वाजवून बघा. फोनची रिंग वाजेल.

### ॲप वर्ल्ड

**कामाचे फीचर्स**



व्हॉट्स ॲपमध्ये लवकरच काही नवी फीचर्स जोडली जाणार आहेत. त्यापैकी एक म्हणजे ‘स्टीकर नोटिफिकेशन प्रीव्ह्यू’. हे फीचर युजर्सना स्टीकरसोबतच व्हॉट्स ॲप मेसेज प्रीव्ह्यू करण्याची सोय उपलब्ध करून देईल. बिझनेस ॲप वापरणाऱ्यांसाठी ‘प्रोडक्ट कॅटलॉग’ हे फीचर असेल. छोट्या व्यावसायिकांना त्याचा उपयोग होईल.

### गेमिंग

**वेड ‘पब्जी’चं**

‘पब्जी’ या मोबाइल गेमने तरुणाईला अक्षरश: वेड लावलं. मित्रांनो, भारतीय क्रिकेटपटूही पब्जी गेमचे चाहते आहेत. बसमधून प्रवास करताना, फावल्या वेळात ते पब्जी गेम खेळत असतात.



महेंद्रसिंह धोनी, मनिष पांडे, युजवेंद्र चहल आणि केदार जाधव पब्जीचे मास्टर्स आहेत. फिरकी गोलंदाज कुलदीप यादवनेच याचा खुलासा केला होता. पब्जी लवकरच अपडेट होणार आहे. सध्याचा हंगाम संपल्यानंतर नव्या रुपातलं पब्जी तुम्ही खेळू शकता. पब्जीने क्रिकेटपटूंनाही झपाटून टाकल्याचं दिसतंय.

## स्वित्झर्लंडसारखी भारतातील ठिकाणे

**भटकंती**

भारत निसर्गसौंदर्यासाठी जगभर प्रसिद्ध आहे. इथे अनेक सुंदर ठिकाणे आहेत. ती पाहण्यासाठी लोक लांबून येतात. प्रवासासाठी उन्हाळी सुटी हा सर्वोत्तम काळ आहे आणि प्रवासाचा विचार येतो, तेव्हा लोक प्रथम परदेशात जाण्याचा विचार करतात; मात्र अनेक कारणांमुळे परदेशात जाण्याची योजना अपूर्ण राहते. अशा परिस्थितीत भारतात परदेशासारखी ठिकाणे पाहायची संधी मिळाली तर? होय, हे अगदी शक्य आहे. कारण आपल्या देशातही अशी अनेक ठिकाणे आहेत, जी परदेशातील नयनरम्य पर्यटनस्थळांसारखी वाटतील. भारतातील अशा ठिकाणी गल्यास तुम्हाला स्वित्झर्लंडमध्ये असल्यासारखे वाटेल. या ठिकाणांना भारताचे स्वित्झर्लंड असेही म्हटले जाते.

**औली**

उत्तराखंड राज्यातील औली हे देशातील सुंदर हिल स्टेशनपैकी एक आहे. त्याला भारताचे स्वित्झर्लंड असेही म्हटले जाते. हे चमोली जिल्ह्यात आहे. तिथे तुम्ही परदेश प्रवासाचा आनंद घेऊ शकता. आपल्या सौंदर्यासोबतच हे हिल स्टेशन स्कीइंगसाठी पर्यटकांची पहिली पसंती आहे.

**खज्जियार**

हिमाचल प्रदेशात असलेल्या या शहराला भारताचे मिनी स्वित्झर्लंड म्हणतात. रोजच्या गजबजाट, गर्दी आणि कोलाहलापासून दूर काही शांततापूर्ण क्षण घालवायचे असतील तर हे योग्य ठिकाण आहे. येथील नैसर्गिक सौंदर्य आणि शांतता मन मोहून टाकेल.

**नौकुचियाताल**

उत्तराखंडमधील नौकुचियाताल हे देखील एक असे ठिकाण आहे, जिथे गेल्यावर परदेशात प्रवास केल्यासारखे वाटते. नैनितालजवळील हे सुंदर हिल स्टेशन भीमतालपासून फक्त पाच किलोमीर अंतरावर घनदाट जंगलांनी बहरलेले एक ठिकाण आहे, जिथे नैनितालचा सर्वात खोल तलाव आहे.

**मॅक्लोडगंज**

शिमला-मनालीसारख्या गर्दीच्या ठिकाणी जायचे नसेल तर मॅक्लोडगंज हे एक चांगले ठिकाण आहे. हे हिल स्टेशन त्याच्या सौंदर्य आणि शांततेसाठी प्रसिद्ध आहे. हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यात वसलेले हे शहर तिबेटी लोकांचे घर आहे.

**मुन्सियारी**

मुन्सियारीला उत्तराखंडचा आत्मा म्हटले जाते. याला ‘मिनी स्वित्झर्लंड’ असेही म्हणतात. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले हे एक छोटेसे गाव आहे. इथून तुम्हाला घनदाट जंगले आणि आजूबाजूला बर्फाच्छादित शिखरांचे सुंदर दृश्य दिसते.






## ‘किंग ए आय’ने ‘एआय’ला टाकले मागे

**अपडेट**

‘किंग एआय’ हे उत्तम आणि अविश्वसनीय फोटो आणि व्हिडिओ तयार करू शकणारं एआय टूल आहे. ‘किंग एआय’ २.० मध्ये मोशन क्वालिटी, व्हिज्युअल एस्थेटिक्स आणि सिनेमॅटिक रिस्पॉन्सिव्हनेस यासारखी फीचर्स आहेत. कंपनीच्या म्हणण्यानुसार याचा वापर करून तयार केलेल्या व्हिडीओमधले मानवी भाव अतिशय नैसर्गिक आहेत. ‘किंग ए आय २’ लाँच करण्यापूर्वी त्याची अनेक आंतरराष्ट्रीय मानकांनुसार चाचणी करण्यात आली. त्यात त्याने इमेज-टू-व्हिडिओ जनरेशनमध्ये जागतिक ‘एआय’ टूल्सना मागे टाकलं आहे. याचे परस्परसंवादी ‘एआय’ अनुभव ‘एआय’ मल्टी=मॉडेल व्हिज्युअल लँग्वेज (एमव्हीएल) ला सपोर्ट करतात. त्यामुळे याचा वापर करून परस्परसंवादी आणि नियंत्रण करण्यायोग्य व्हिडीओ तयार करता येतात. त्याच्या स्टँडर्ड आणि मास्टर अशा दोन आवृत्त्या लाँच करण्यात आल्या आहेत. मास्टर आवृत्ती प्रगत एडिटिंग टूल्स आणि उत्तम आउटपुट गुणवत्ता देते. हे ‘एआय’ केवळ सर्जनशील उद्योगासाठीच ‘गेम चेंजर’ ठरेल असं नाही, तर त्यामुळे भविष्यात हॉलीवूड आणि मीडिया निर्मितीचा मार्गदेखील बदलू शकतो.

## जुने ब्लॅक अँड व्हाईट फोटो करा रंगीत!

**रंजक**

मित्रांनो, आपल्या जुन्या आठवणी पुन्हा जागवण्याचा मार्ग म्हणजे जुने फोटो पाहणं. पण बरेचदा ते कृष्णधवल असतात. ते रंगीत करता आले तर काय मजा येईल, असं मात्र वाटून जातं. आता यासाठी तुम्ही चॅटजीपीटीचा वापर करू शकता. कृष्णधवल फोटो रंगीत करण्यासाठी ‘चॅटजीपीटी’चा वापर करण्याची पद्धत खूप सोपी आहे. तुमच्याकडील जुने कृष्णधवल फोटो रंगीत करायचे असतील तर ‘चॅटजीपीटी’ च्या मदतीने रंगीत करता येतात. हा नवीन ट्रेंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. लोक आपले जुने कौटुंबिक फोटो रंगीत करून घेत आहेत. यासाठी सर्वप्रथम ‘चॅटजीपीटी’ वेबसाइट किंवा मोबाइल ॲपवर जा. ‘चॅटजीपीटी’ची इमेज अपलोडिंगला सपोर्ट करणारी आवृत्ती वापरत असल्याची खात्री करा. आता तुम्हाला रंगीत करायचा असलेला कृष्णधवल फोटो अपलोड करा. ‘चॅटजीपीटी’ला हा ब्लॅक अँड व्हाईट फोटो वास्तविक रंगीत फोटोसारख्या दिसणाऱ्या नैसर्गिक रंगीत व्हर्जनमध्ये रूपांतरित करा’, अशी सूचना द्या. तुमचा नव्याने रंगीत झालेला फोटो समोर तयार होईल..



## टॉपर व्हायचेय, मग या टिप्स फॉलो करा

**स्टडी टिप्स**

प्रत्येक विद्यार्थ्याला आयुष्यात यश मिळवायचे असते. त्याची अभ्यासाची स्वतःची पद्धत असते. टॉपर विद्यार्थी अभ्यासासाठी काही खास टिप्स फॉलो करतात. त्यामुळे ते अभ्यासात यश मिळवतात. चला पाहूया अशा कोणत्या खुबी वापरल्या जातात...

विद्यार्थ्यांसाठी टिप्स

१. वेळापत्रक तयार करा: वेळापत्रकानुसार अभ्यास करून विद्यार्थी वेळेवर अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात आणि अभ्यासात सुधारणाही करू शकतात. त्यामुळे त्यांना परीक्षेत चांगले गुण मिळतात.

२. पुनरावृत्ती (सराव): अभ्यासक्रमाची दोन-तीन वेळा उजळणी करून विद्यार्थी यश मिळवू शकतात. उजळणी करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी गोष्टी सहज लक्षात ठेवता येतात.

३. नोट्स बनवा: यशस्वी विद्यार्थी उजळणी करताना स्वत:च्या नोट्स काढतात. प्रत्येक वेळी ते उजळणी करून त्या विषयाच्या नोट्स आणखी सोप्या करतात. याच्या मदतीने विद्यार्थी परीक्षेपूर्वी नोट्समधून झटपट उजळणी करू शकतात.

४. माईंड मॅप बनवा: अनेकांचा असा विश्वास असतो की माईंड मॅपद्वारे गोष्टी सहज लक्षात ठेवल्या जाऊ शकतात. माईंड मॅप्सच्या मदतीने तथ्ये, तारखा आणि क्रम सहज लक्षात ठेवता येतो.



५. अवघड विषय आधी वाचा: काही लोक कठीण विषयाचा अभ्यास सर्वात शेवटी करायचं ठरवतात. त्यामुळे ते विषय शेवटपर्यंत वाचता येत नाहीत. यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम कठीण विषयांचा अभ्यास केला पाहिजे. नंतर ते सोप्या विषयांचा अभ्यास करू शकतात.

६. दुसऱ्याला शिकवा: तुम्ही शिकलेलं दुसऱ्याला शिकवलं तर तो विषय तुमच्या चांगला लक्षात राहील. आपला मेंदू पूर्वी शिकलेल्या सुमारे ९० टक्के गोष्टी दीर्घ काळासाठी लक्षात ठेवू शकतो.

७. स्वत:साठी अभ्यासाची उद्दिष्टे निश्चित करा: विद्यार्थ्यांनी स्वत:साठी छोटी उद्दिष्टे ठेवली, तर ती साध्य केल्यावर ते यशस्वी होतील. ते त्यांना आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देईल.

८. अभ्यासासाठी एक वेळ ठरवा: यशस्वी होण्यासाठी तुम्हाला कधी अभ्यास करायचा आहे आणि दिवसात कधी ब्रेक घ्यायचा आहे हे ठरवा. अभ्यासासाठी वेळ निश्चित करा. त्यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येते

९. टेस्ट सिरिज: यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी मॉक टेस्ट सिरीज सोडवावी: जेणेकरून ते परीक्षेपूर्वी आपल्या तयारीची चाचणी घेऊ शकतील आणि त्रुटी आणि चुका सुधारू शकतील.

१०. योग्य साहित्य निवडा: विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत करून अभ्यास करतात; पण परीक्षेप्रसंगी त्यांना काही आठवत नाही. अभ्यासक्रमात दिलेली पुस्तके आणि तज्ज्ञांनी किंवा शिक्षकांनी सुचविलेल्या पुस्तकांमधूनच तयारी करा. योग्य अभ्यास साहित्य तुमच्या यशासाठी खूप उपयुक्त ठरेल.

# अहिल्यानगर शहर विकासासाठी ५५१ कोटींचा निधी उपलब्ध करावा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तायगा शिंदे यांची मागणी**




नगर – जुनी अहमदनगरमहानगरपालिका स.नं.१९९९ मध्ये मनपा हददी वाढीसह महानगरपालिका झालेली आहे. हद्दवाढ झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेच्या विकासासाठी कोणत्याही प्रकारे निधी दिलेला नाही. त्यामध्ये ३ ते ४ ग्रामपंचायती या मनपामध्ये समाविष्ठ झालेल्या आहे. तेव्हा पासुन आज अखेर २० ते २५ वर्ष होवुन सुध्दा मनपाच्या विकासासाठी नव्या अहमदनगरचे अहिल्यानगर महानगरपालिका झाली आहे. यापुर्वीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सन २०१९ मध्ये निधी मिळणेसाठी पत्रव्यवहार केला आहे. तरी महानगरपालिकेस निधी मिळालेला नाही. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर २९-१२-२०२२ रोजी त्यांना सुध्दा मनपाच्या विकासासाठी निधी मिळणे करिता पत्र व्यवहार केला आहे. तरी महानगरपालिकेस निधी मिळालेला नाही. तसेच तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना सुध्दा पत्र दिलेले असता त्यांनी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निधी देणे शिफारस पत्र सुध्दा दिले होते. तरी निधी काही मिळालेला नाही.

अहिल्यानगर महानगरपालिका सध्या आर्थिक संकटात असुन 'ड' वर्गाची मनपा आहे. या ठिकाणी उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहे. शहराचे व पाणी योजनेचे लाईट बिल नगरपालिका पासुन महानगरपालिका पर्यंत वीज महाविरतण कंपनीचे बील २०० ते २५० कोटीच्या पुढे आहे व ठेकेदाराचे बील देणी ७० ते ८० कोटी रु., शहरातील स्ट्रीट लाईटचे ठेकेदाराचे ८ ते ९ कोटी रु. थकित आहे. तसेच घनकचरा ठेकेदारचे ५ ते ६ कोटी रुपये थकीत आहे. कर्मचाऱ्यांचे याचे पगार, पेन्शनरचे पेन्शन व शहर विकासाठी कुठल्याही प्रकारे निधी नसल्याने शहरात विकासाचे कामे ठप्प झालेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या विकास कामांना रु.५५१ कोटी रुपयांची घोषणा करण्यात यावी. सन २०१८ मध्ये मनपामध्ये भारतीय जनता पक्षाचा महापौर झाल्यास मनपास विकास कामासाठी रुपये ३०० कोटीचा निधी देणेबाबत रावसाहेब दानवे यांनी घोषणा केली होती. मात्र घोषणा भारतीय जनता पक्षाचा महापौर झाल्यानंतर सुध्दा कुठल्याही प्रकारे निधी मिळाला नाही.

तरी अहिल्यानगर महानगरपालिकेचे निवडणुक स.न. २५-२०६ ला होणार असल्याने आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आले पाहिजेत या दुष्टीकोनातुन आपण यासाठी गांभीर्याने विचार करुन रु.५५१ कोटी रुपये निधी लवकरात लवकर देण्यात यावा. अहिल्यानगर शहराच्या नागरिकांना महानगरपालिकेकडुन मोठ्या प्रमाणात विकासकामे होणेबाबत मोठया अपेक्षा आहे. तसेच महाराष्ट्राच्या मध्य ठिकाणी अहिल्यानगर महानगरपालिका असुन या ठिकाणाहुन महाराष्ट्रात सर्व ठिकाणी जेण्या-येण्यासाठी सोईस्कर आहे. महाराष्ट्रातील नागरिकांचे रस्ते नीट नसल्याने मोठे खेडे म्हणुन ओळखतात तरी ती ओळख पुसण्यासाठी सदरचा निधी हा तात्काळ जाहीर करावा, अशी मागणी माजी नगरसेवक तायगा शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## सहा वर्षाच्या अर्णाने गायलेल्या महाराष्ट्र गीताने रसिक मंत्रमुग्ध

**मुंदडा परिवारातील लाडक्या लेकीचे सर्वच स्तरातून कौतुक**




नगर – १ मे महाराष्ट्र दिनाच्या औचित्य साधून अर्णा सचिन मुंदडा हीने 'गर्जा जयजयकार महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र गीत सादर करून ते तालबद्ध पद्धतीने गाऊन दाखवले. उत्कृष्टपणे गाऊन दाखवलेले हे गीत ऐकून उपस्थित सर्वच मंडळी मंत्रमुग्ध झाली. अगदीच वय वर्ष ६ असलेल्या या छकुलीने अगदी हावभावासहीत अप्रतिमपणे हे गीत बोबड्या बोलीत सादर केले, त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेक युट्युब आणि लोकल चॅनेलवाल्यांनी तिचा शोध घेऊन हे गीत समाजमाध्यमांमध्ये व्हायरल केलेले आहे. त्यामुळे सर्वात स्थरातून छोट्या आणि नटखट अशा अर्णावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. अर्णा ही तिने गायलेल्या 'महाराष्ट्रगीता'मुळे चर्चेत आलेली आहे. अतिशय चुणचूणीत असलेली कुमारी अर्णा छत्रपती संभाजीनगर शहरातील अग्रसेन विद्या मंदिर या शाळेत पहिलीच्या वर्गात शिकत आहे.

अर्णाचे वडील कार्यकारी संपादक आहेत. तिची आत्या शिक्षिका आहे. पत्रकार अरुणकुमार मुंदडा यांची अर्णा ही नात आहे. मागील वर्षी अर्णाचा मोठा भाऊ अर्णव याचे एक पुस्तक दिल्ली येथील एका प्रकाशनाने प्रकाशित केलेले आहे.

## स्वर्गीय प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची जागा अन्य संस्थेला न देता महानगरपालिकेने चालवावी

नगर – भाजप शिवसेना मनपामध्ये सत्तेमध्ये असताना स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सावेडी हे सन २००३-०४ मध्ये मनपाच्या वतीने चालू करण्यात आले होते. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या दृष्टीने एक अत्यंत उपयुक्त व पथदर्शी अशा प्रकारचा प्रकल्प मनपाद्वारा सुरू करण्यात आला होता. अनेक गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभझाला आहे. जवळपास ७०० विद्यार्थ्यांना याचा लाभ होऊन ते अधिकारी या पदावर आज कार्यरत आहेत. सदर प्रकल्प हा मनपाच्या हलगर्जी निष्काळजी पणामुळे व उदासीनतेमुळे बंद पडला हे त्रिवार सत्य आहे. वास्तविक पाहता शहरातील विद्यार्थ्यांची बौद्धिक भूक भागवण्याचा स्तुत्य प्रयत्न मनपा ने केला होता. त्याला आता ग्रहण लावण्याचा जो प्रयत्न चाललेला आहे तो अत्यंत दुर्दैवी व चीड आणणारा प्रकार आहे. मनपा प्रशासकांनी डिसेंबर महिन्यात ठराव करून एका खाजगी संस्थेला ही इमारत नाममात्र आडे आकारून देण्याचा प्रस्ताव मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे. सावेडी सारख्या उपनगरातील एवढी मोठी महागडी इमारत भाड्याने देण्याचा ठराव पारित करून गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना ज्ञानापासून व रोजगारापासून वंचित ठेवण्याचा हा प्रयत्न आहे असे मला वाटते. आपणास या संदर्भामध्ये हे केंद्र चालू होण्याच्या दृष्टीने जे जे सहकार्य आवश्यक आहे ते ते आम्ही करण्यास तयार आहोत.

सदरचा ठरावांमध्ये बदल करण्यात यावा सदरची इमारत ही इतर खाजगी संस्थेला न देता स्वर्गीय प्रमोद जी महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र हे पूर्ववत मनपाने चालवावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केली आहे.





आमदार काशिनाथ दाते, आ. अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांना निवेदन देताना जगदंब फाउंडेशन अंतर्गत साऊ एकल महिला समितीचे पदाधिकारी व एकल महिला.

## एकल महिलांसाठी जगदंब फाउंडेशनचे विविध मंत्री, आमदारांना निवेदन व चर्चा

**लग्न न जमणारी मुले व एकल महिला यांच्या लग्नास प्रोत्साहन मिळण्यासाठी निवेदन**

नगर – अहिल्यादेवी होळकर यांचा जन्मस्थानी चौंडी तालुका जामखेड येथे त्यांच्या जयंतीनिमित्त मंत्रिमंडळाची बैठक होत आहे. यामध्ये एकल महिलांच्या सर्वेक्षणाचा प्रश्न घेऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याबाबत चर्चा करावी, असे निवेदन जगदंब फाऊंडेशनचे सचिव अशोक कुटे, रवींद्र सातपुते, राजेंद्र कर्डीले, अजित कटारिया, सिसिलिया मनेळ, स्मिता साळवे, उषा बनगे, स्वाती वाघमोडे या एकल महिलांनी आमदार काशिनाथ दाते, आ.अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांना शासकीय विश्राम गृहामध्ये समक्ष भेटून निवेदन देण्यात आले. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना देखील निवेदन पाठवण्यात आले आहे.

यावर आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ या तिघांनीही एकल महिलांच्या विषयावर आम्ही चर्चा करू असे आश्वासन दिले. तसेच ज्या मुलांचे लग्न जमतच नाही अशा मुलांचे एकल महिलांसोबत लग्न लावल्यानंतर त्यांना शासनाकडून प्रोत्साहन, सन्मान मिळण्याबाबत देखील आम्ही चर्चा करू असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात आज विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे. फक्त अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ही संख्या एक लाख ७ हजार एवढी आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ही संख्या ७० लाखापर्यंत जाणार आहे. या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी, सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच अहिल्यादेवी यांचे स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल.

एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण जर तयार झाले तर निश्चित त्या महिलांना न्याय मिळेल अशी अपेक्षा यावेळी जगदंब फाऊंडेशनचे सचिव व साऊ एकल महिला समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक कुटे यांनी व्यक्त केली.

## प्रियदर्शनी कनिष्ठ महाविद्यालयाचा सलग १२ वर्षे १०० टक्के निकाल



प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज या कनिष्ठ महाविद्यालयाचे १२ वीत यशस्वी झालेले विद्यार्थी. समवेत प्राचार्या श्रीमती अंजली बोधक आदी.

नगर – प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज या कनिष्ठ महाविद्यालयाचा इ.१२ वी सायन्सचा वार्षिक निकाल १००% लागला असून सलग बारा वर्षापासून शंभर टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आणि प्रियदर्शनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. यामध्ये रिया अमितकुमार कुलांगे ९२.५०%, गायकवाड दिग्विजय संतोष ८९.३३%, काटे श्रावणी रामेश्वर ८६.३३%, पवार मानसी राहुल ८५.००%, पराशर आयुष अक्षय ८४.१७% विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले.

कनिष्ठ महाद्यिालयातील एकूण १२३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यामध्ये विशेष प्राविण्य २९ विद्यार्थी, प्रथम श्रेणी ५६ विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणीमध्ये ३७ विद्यार्थी उत्तिर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब मधुकर खोमणे, प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका कु. अनिता थापा आणि शिक्षकांनी अभिनंदन केले आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने सद्गुरू शंकर महाराज यांच्या ७८ वा समाधी सोहळा निमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली असता भाविकांनी ठीकठिकाणी पालखीचे स्वागत केले.

## सद्गुरू शंकर महाराज यांच्या ७८ वा समाधी सोहळा दिनानिमित्त शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

नगर – सद्गुरू शंकर महाराज यांच्या ७८ वा समाधी सोहळा दिनानिमित्त माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मठामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती.

माळीवाडा परिसर येथून भव्य छबिना सोहळा (पालखी) मिरवणूक काढण्यात आली होती. पालखीमध्ये शंकर महाराज यांची मूर्ती होती. पालखी सोहळ्याचे ठीक ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते. पालखी सोहळा मार्गावर भाविकांनी सुंदर रांगोळी काढली होती. हि शोभायात्रा ब्राह्मण गली येथील मठापासून सुरु होऊन शहरच्या विविध भागातून जाऊन पुन्हा मठामध्ये समारोप करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सामुदायिक शंकर गीता पारायण सोहळा. हनुमान चालीसा पाठ कार्यक्रम आदींचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ६ मे रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन कमलेश जंजाळे (महाराज) यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सेवेकरी परिश्रम घेत आहे.

## प्राचीन मूर्ती, शस्त्रे पाहून नगरकर भारावले



ट्रेकॅम्प संस्थेच्या धरोहर उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाची सफर आयोजित करण्यात आली होती.

**'ट्रेकॅम्प-धरोहर'च्या पुढाकारातून ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात उपक्रम**

नगर – महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ट्रेकॅम्प संस्थेच्या धरोहर उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाची सफर आयोजित करण्यात आली होती. पुरातन वस्तू पाहून व त्यांची माहिती अवगत करून उपस्थित आबालवृद्ध इतिहासप्रेमी मनोमन सुखावले.

नागरिकांना जुन्या संस्कृतीशी ओळख व्हावी, तसेच प्राचीन वस्तूंचे महत्त्व अवगत व्हावे या उद्देशाने ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली 'धरोहर'चे समन्वयक करिश्मा कोठारी व मनिष कुलकर्णी यांनी या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे नियोजन केले होते. महाराष्ट्र दिन व वस्तू संग्रहालयाचा वर्धापनदिन एकाच दिवशी आहे. या वेळी उपस्थितांमध्ये लहान मुलांपासून ते वयोवृद्धांचा समावेश होता. सकाळी ८ ते १० या वेळेत आयोजित केलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांना संग्रहालयातील विविध वस्तूंचा माहिती, इतिहास व महत्त्व धरोहर टीमने समजावून सांगितले. त्यात प्राचीन दगडी मूर्ती, काष्ठशिल्प, दुर्मिळ शिवकालीन मुद्रा, शस्त्रास्त्र, भांडी, छायाचित्र, हस्तलिखिते, खापरी नळ यांसह अनेक वस्तूंच्या दालनांचा समावेश होता. या उपक्रमास नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला.

यावेळी संग्रहालयाचे अभिरक्षक संतोष यादव यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. लहान मुलांसह सर्वांनीच हे वस्तू संग्रहालय अवश्य पाहावे यासाठी धरोहरच्या या उपक्रमांचे पुन्हा आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुकांनी ८६६८६०९२९९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## पोकलेन मशीन व्यवहारात बांधकाम व्यावसायिकाची ३० लाखांची फसवणूक

**गुजरातच्या सुरत येथील एकावर गुन्हा दाखल**

नगर – पोकलेन मशीन व्यवहारात नगरमधील बांधकाम व्यावसायिकाची ३० लाखांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी मुळचा नंदुरबार येथील रहिवासी व सध्या सुरत (गुजरात) येथील एकावर फसवणुकीचा गुन्हा कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बांधकाम व्यावसायिक अक्षय राजेंद्र ठाणगे (वय २६, रा. नागापूर एमआयडीसी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा बांधकाम व्यवसाय आहे, व्यवसायासाठी त्यांना पोकलेन मशीनची गरज असल्याने त्यांच्या ओळखीच्या रमजान अन्सारी यांनी सांगितले की भरत जगन्नाथ पाटील (रा. भालेर गाव, जि. नंदुरबार, हल्ली रा. सुरत, गुजरात) यांना त्यांचा पोकलेन मशीन विकायचे आहे. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे भागीदार पंकज मगर यांना पोकलेन मशीन पसंत पडल्याने त्यांनी १६ मे २०२३ रोजी भरत पाटील यांना केडगाव येथील रंगोली हॉटेल येथे विसारापोटी ५ लाख रुपये दिले व बाकीचे २५ लाख दहा दिवसात देऊन मशीन घेण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे २५ मे २०२३ रोजी फिर्यादी व मगर यांनी गुजरात येथे जाऊन भरत पाटील यांना २५ लाख रुपये दिले. त्यावेळी भरत पाटील याने आरटीओ रजेवर आहेत, ते आल्यावर मी कंटेनर पाहून मशीन नगरला पाठवतो असे सांगितल्याने फिर्यादी त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर नगरला आले. फिर्यादी यांनी वारंवार फोन करूनही भरत पाटील याने मशीन पाठवले नाही. त्यानंतर फिर्यादी हे मित्रांसह गुजरात येथे भरत पाटील यांच्या घरी गेले असता भरत पाटील यांनी मी तुम्हाला मशीन देऊ शकत नाही, तुमचे पैसे माझ्या मूळ गावी नंदुरबार येथील बँकेत आहेत ते मी तुम्हाला लगेच काढून देतो असे म्हटले. त्यामुळे फिर्यादी हे मित्रांसह नंदुरबार येथे जात असताना त्यांना गुजरात पोलिसांनी पकडले. तेव्हा त्यांना कळाले की भरत पाटील यांच्या पत्नीने पोलिसांना कळविले होते की माझे पती यांना क्रेटा गाडीत उचलून घेऊन किडनॅप केले आहे. त्यामुळे गुजरात पोलिसांनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना पकडले. यावेळी गुजरात पोलिसांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला. त्यामुळे फिर्यादी सह त्यांचे मित्र ३२ दिवस जेलमध्ये होते. भरत पाटील यांनी त्यांना पोकलेन मशीन न देता पैसेही माघारी न देऊन विश्वासघात करून फसवणूक केली. त्यामुळे अक्षय ठाणगे यांनी अखेर कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी भरत पाटील याच्या विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ४०६, ४२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



जिल्ह्यात अवैध धंद्यांवर छापेमारी करत कारवाई केल्यावर आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## नगर जिल्हयातील २३ अवैध दारु धंद्यावर छापेमारी; १ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – बेकायदेशीर रित्या सुरु असलेल्या २३ अवैध धंद्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई करत १ लाख ८३ हजार ८७५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पाथर्डी, नगर तालुका, श्रीरामपूर शहर, नेवासा, श्रीगोंदा, राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यामधील अवैध व्यावसायिकांची माहिती काढून कारवाई करणेबाबत आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या सात पथकांनी जिल्हयातील नगर तालुका, श्रीरामपूर शहर, नेवासा, श्रीगोंदा व राहुरी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याची माहिती काढून २३ ठिकाणी छापे टाकून ३२ जणांविरुद्ध कारवाई केली.

या कारवाईत नगर तालुका पोलीस ठाण्याचे हद्दीत ३ ठिकाणी ३२ हजार ५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु, श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ ठिकाणी १४ हजार ८७० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु, नेवासा पोलीस ठाणे हद्दीत ३ ठिकाणी दारु धंद्यावरील कारवाईत ५ हजार ३२० रुपये किमतीची हातभट्टी दारु, श्रीगोंदा पोलीस ठाणे येथील ३ दारु अड्ड्यावर छापा टाकून १० हजार ५८५ रुपये किमतीची हातभट्टीची दारु, राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ जुगार अड्डयावर छापा टाकून २० हजार ६०० रुपये असा १ लाख ८३ हजार ८७५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

